मंगळवार, २५ जुलै २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक -१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAYY 25 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-1 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-14 • PRICE-5

# पुरवणी मागण्या आमदार फोडण्यासाठी आणि फोडलेले सांभाळण्यासाठी : बाळासाहेब थोरात

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई : राज्य सरकारने ज्या 41 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत त्या, आमदार फोडण्यासाठी आणि फोडलेले आमदार सांभाळण्यासाठी आहे ज्यांना मंत्री करू शकत नाही त्यांना भरघोस निधीची खैरात वाटली आहे. आमदारांमध्ये आणि जनतेमध्ये यामुळे असंतोष निर्माण झाला आहे सरकारने अन्याय दूर करावा अन्यथा आम्हाला न्यायालयात जावे लागेल असा इशारा काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी सभागृहात दिला. विधिमंडळाच्या अधिवेशनात पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान बोलताना निधीच्या असमान वाटपाची यादीच दाखवत थोरातांनी सरकारची पोलखोल केली.**

ते पुढे म्हणाले की, सरकार सत्तेवर येऊन एक वर्ष झाले आहे. या एक वर्षात आपण चार अधिवेशने केली. मागच्या पावसाळी अधिवेशनात आपण 25 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये 52 हजार कोटी रुपयांच्या विक्रमी पुरवणी मागण्या मांडल्या आणि या अधिवेशनामध्ये 41 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सरकारने सादर केल्या आहे. एका वर्षभरात फक्त पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून एक लाख वीस हजार कोटी रुपये वाटप केले जातात हे राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी चांगले लक्षण नाही. एकूण अर्थसंकल्पाच्या पाच ते दहा टक्के पुरवणी मागण्या असाव्या असा संकेत आहे मात्र हा संकेत या सरकारने पायदळी तुडवला आहे. आम्ही देखील या अगोदर सरकार मध्ये राहिलेलो आहोत आणि विरोधी पक्ष म्हणूनही आम्ही कामकाज केलेले आहे. इतिहासात कधीच झाले नव्हते अशा घटना या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून घडलेल्या आहेत.

निधी वाटपाची यादी दाखवत थोरात म्हणाले, "१०५ आमदार असलेल्या सत्ताधारी भाजपाच्या अनेक आमदारांना देखील अत्यंत तुटपुंजा निधी दिला आहे. हा असमतोल योग्य नाही. मी प्रत्येक विधानसभा मतदारसंघाची आकडेवारी काढलेली आहे, ज्यांना निधी मिळाला त्यांच्याबद्दल माझ्या मनात आकसाची भावना नाही, म्हणून मी त्यांची नावे सभागृहात जाहीर करीत नाही, मात्र आपण ६५ टक्के निधी सत्तेत सहभागी असलेल्या १०० आमदारांना दिलेला आहे. मी यासंदर्भात केवळ आकडे सांगणार आहे, ७४२ कोटी, ५८० कोटी, ४८२ कोटी, ४५६ कोटी, ४३६ कोटी, ३९२ कोटी या सगळ्या शेकडो कोटीतल्या रकमा आहेत. ज्यांना आपण मंत्री करु शकत नाही त्यांना आपण भरघोस निधी दिल्याचे दिसून येते. आपण जर समतोल साधणार आहात असे म्हणताय तर मग एका मतदारसंघात शेकडो कोटीची खैरात वाटताय आणि बाजूच्या मतदारसंघात शून्य, हा कोणता न्याय म्हणावा ? मी सभागृहाच्या माहितीसाठी एका जिल्ह्याचे उदाहरण देणार आहे. या जिल्ह्यात एकाच मतदारसंघात ७३५ कोटी आणि बाकी संपूर्ण जिल्ह्यासाठी २१५ कोटी यामुळे राज्याचा समतोल तर बिघडणारच पण आपल्यातलाही असमतोल वाढेल. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मंजूर केलेल्या कामांना आपण आकसापोटी स्थगिती दिलेली आहे, आम्ही वारंवार मागणी केली, आपणाकडे पुरवणी मागण्यांसाठी १ लाख २५ हजार कोटी आहेत आणि स्थगिती उठविण्यासाठी २ हजार कोटी शिल्लक नाही, हा कसला न्याय ?

थोरात पुढे म्हणाले, "आपण 41 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. मात्र दुसऱ्या बाजूने अनेक विकास कामांचे शासकीय देणे अजूनही बाकी आहे. एकट्या अहमदनगर जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागाला सहाशे वीस कोटी रुपये अदा करणे बाकी आहे. राज्यभर हा आकडा 50 हजार कोटी रुपयांपर्यंत असल्याची चर्चा आहे. एकीकडे आपण मोठ्या मोठ्या घोषणा करतात, तरतुदी करतात. दुसरीकडे अनेक विभागांची शासकीय देणे बाकी आहे. अनेक भागांमध्ये विकास काम शासनाकडून बिले अदा न झाल्याने थांबली आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे

आधुनिक केसरी

रेडिओवर तुकोबांचा अभंग लागला होता. लताबाई गात होत्या. त्या गाण्याच्या तालावर श्यामरावांनी ठेका धरला होता. तेही गुणगुणू लागले होते, ' वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे...' एवढ्यात राजेशने त्यांची तंद्री भंग केली..' बाबा, ऐका ना मी काय म्हणतोय ते... ?' श्यामराव आपल्या तंद्रीतून बाहेर येत म्हणाले, ' हं, बोला राजे. ' राजेश म्हणाला, ' बाबा, हा संत तुकाराम महाराजांचा अभंग आहे ना ?' श्यामराव राजेशच्या ज्ञानावर खुश होत म्हणाले, ' अगदी बरोबर. बेटा, तुला आवडला का हा अभंग ? लता मंगेशकरांनी फार सुंदर गायला आहे बरं .'' अहो बाबा, अभंग तर सुदंर आहेच. पण मला विचारायचे ते वेगळेच आहे. '' बोल बोल काय विचारायचे आहे तुला ?' बाबा म्हणाले.. राजेश म्हणाला, ' बाबा, आता जसे शाळेत पर्यावरणाचे महत्व शिकवतात. झाडे लावा वगैरे सांगतात. तसे तुकाराम महाराजांच्या काळी पण सांगत असावेत का हो ?' हा प्रश्न ऐकल्याबरोबर बाबांना हसू फुटले. तशी पिंकी मध्ये येत म्हणाली, ' बाबा, हा राजेश ना काय विचारेल काही सांगता येत नाही..' ' नाही नाही पिंके, अग आपल्या राजेशला पडलेला प्रश्न बरोबरच आहे. या प्रश्नाचे उत्तर मी सांगतो. पण त्याआधी तू एक काम कर. तू आईला आपल्या सगळ्यांसाठी मस्त गरमागरम पोहे करायला सांग. आणि पोहे झाले की तिला पण इकडे ये म्हणावं. ' ' हो बाबा, आता सांगते आईला ' असं म्हणत पिंकी स्वयंपाकघराकडे पळाली. ती गेली तशी परतलीही. राजेश म्हणाला, ' आता सांगा ना बाबा माझ्या प्रश्नाचे उत्तर. ' हो सांगतो. त्याचं काय आहे राजेश, त्या वेळी आजच्यासारख्या शाळा वगैरे नव्हत्या. गुरुजी किंवा पंतोजी घरी येऊन शिकवायचे. काही ठिकाणी गुरुकुलासारखी पद्धतही होती. पण वृक्षांचे, पर्यावरणाचे महत्व वेगळे सांगावे लागत नव्हते. कारण त्याची जाण त्या काळातील लोकांना म्हणजेच आपल्या पूर्वजांना मुळातच होती. ते स्वतःच पर्यावरणाला जपायचे, त्याची काळजी घ्यायचे. त्याचे संस्कार आपोआपच त्या काळातील लहान मुलांवर व्हायचे. वृक्षांना पवित्र मानून त्यांची पूजा केली जायची. कामापुरतीच विशिष्ट झाडे तोडली जायची. जंगले शाबूत होती, घनदाट होती. त्यावर लोकांची उपजीविका चालायची. आणि तुकाराम महाराजांसारखे संत तर वनातच राहायचे. तिथेच त्यांची उपासना, ध्यान, जपतप इ. गोष्टी व्हायच्या. त्या वनातील वृक्ष, प्राणी हेच त्यांचे सखेसोबती असायचे. त्यांच्या संगतीत त्यांचा वनवासही सुखकर व्हायचा. आणि दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या साधूसंतांना मुळातच पर्यावरणाची जाण होती, त्याचे महत्व कळले होते. समर्थ रामदासांच्या दासबोधात सुद्धा कितीतरी ठिकाणी वेगवेगळ्या कारणाने वृक्षांचा उल्लेख त्यांनी केला आहे. ' बाबांनी सोप्या शब्दात सांगण्याचा प्रयत्न केला. ' बरोबर आहे बाबा तुमचं, ' पिंकी म्हणाली. आमच्या शाळेतल्या बाईंनी आम्हाला एक पुस्तक वाचायला सांगितलं आहे. अं, काय बरं त्याचं नाव ? हं , आठवलं. ' दास डोंगरी राहतो ' असं काहीतरी नाव आहे. म्हणजे समर्थ डोंगरातच राहत होते ना.. ? ' हो बरोबर आहे पिंकी,' आई पोह्याच्या डिश ठेवत म्हणाली. ' अगं, गो नी दांडेकरांची आहे ती कादंबरी. आपल्याकडे आहे. मी देईन तुला काढून. '' अहो, मी काय म्हणते ? उद्या रविवार आहे. आपण बऱ्याच दिवसात कुठे बाहेर गेलो नाही. आपण मुलांना घेऊन कुठेतरी जाऊ या का ?'



## आनंदी पहाट

# जाणीवपूर्वक उणिवा दूर कराव्यात

आधुनिक केसरी

सुख हे ज्याच्या त्याच्या मानसिकतेवर अवलंबून असतं. दिवसभर नुसतं गेट उघड-बंद करणे, असं अतिशय नीरस काम करणारा वॉचमन तुम्हाला पाहून येता जाता तोंडभरून हसतो तेंव्हा त्याचं कौतुक वाटतं. तो करत असलेल्या कामांत त्याला काय हवंय आणि तेथील लोकांना काय हवंय हे त्याला नीट कळलेलं असतं. अनेकदा आपल्याला नेमकं काय हवंय हेच कळलेलं नसतं. आवडलेलं आणि निवडलेलं ह्यांची जेव्हा सांगड घालता येत नाही तेव्हा आयुष्यात उरते ती फक्त तडजोड; कारण आवडलेलं कधी आपल्याला विसरा येत नाही आणि निवडलेलं मनापासून स्वीकारता येत नाही. परंतू निवडलेलंच जेव्हा आवडायला लागतं, तेव्हा तडजोडीचा प्रश्नच उरत नाही. काहीवेळा आवडीनं निवडायला सवड काढावी लागते, ह्याची सुद्धा जाणीव होणं जरुरीचं असतं. सतत कपाळावर आठ्या घेऊन, महागड्या गड्यांमधून फिरणाऱ्या एखाद्या धनाढ्य व्यक्तीला बघितलं कि त्याचं सुख कुठेतरी हरवलंय असं वाटतं. सुखाचा पैशाशी काहीही संबंध नसतो. आपल्याला हवा तेंव्हा आणि हवा तितका मिळणारा मानसिक आधार महत्वाची भूमिका बजावत असतो. आपल्या प्रत्येकाच्या सुखदुःखाशी निगडित काय आहे, हे अभ्यासपूर्वक समजून घेणं अनेकदा आपल्याकडून दुर्लक्षित होतं. मन जर आनंदी असेल तर कोणतेही शारीरिक / मानसिक कष्ट जाणवत नाहीत, हेही तितकंच खरं असतं. आपण आपल्या उणिवा दूर करत गेलोत आणि प्रत्येक बाबतीतील जाणीव करून घेत गेलोत कि समाधान मिळायला सुरुवात होतेच. पण आपण आपल्यांत काही उणिवा आहेत ह्याची जाणिवाच करून घेत नाहीत, त्यामुळे असमाधानी राहतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# चिंतन..

आधुनिक केसरी

चिंतन ही एक खूप चांगली गोष्ट आहे .कोणत्याही गोष्टीचे चिंतन हे झालेच पाहिजे. चिंतन ,मनन झाले की मनशांती होते. एखादी गोष्ट आपण वाचली, ऐकली किंवा पाहिली आणि त्याचे चिंतन केले तर त्या ज्ञानाचे दृढीकरण होते. मनात एक प्रतिमा तयार होते .चिंतन करावे पण चांगल्या गोष्टीचे. नको त्या गोष्टीचे चिंतन केल्याने मनाला शांती मिळण्याऐवजी मनस्ताप जास्त होतो .असाध्य गोष्ट साध्य करण्यासाठी चिंतनाची खूप गरज असते म न एकाग्र झाले तर चिंतन होईल. त्यासाठी ध्यानाची पण गरज असते. वाऱ्याच्या झुळकेने पालापाचोळा उडून जावा आणि कचरा साफ व्हावा तसे चिंतनाने नकारात्मक विचार उडून जावे व सकारात्मक विचार मनात, हृदयात घट्ट रुजवावेत. परमेश्वर मंदिरात आहे की माणसात आहे हे शोधता आले पाहिजे .मंदिरात बसून किंवा घरात बसून कितीही वर्ष देवाचे चिंतन करत बसला तर देव भेटणार नाही. पण ते जर फावल्या वेळात गरजूंसाठी काही मदत करायला रस्त्यावर उतरलो तर देव नक्कीच भेटेल. देव मंदिरात नाही, देवळात नाही तो तुमच्या आमच्या हृदयात आहे. दीनदुबळ्यांच्या मदतीत आहे. काम करणाऱ्या लोकांच्या हातात आहे. त्यांच्या थकलेल्या डोळ्यांच्या नजरेत आहे .प्रेमासाठी आसुसलेल्या हृदयात आहे. या गोष्टींचे चिंतन व्हावे, गरजूंसाठी धावून जावे. कुठे कधी काय कोणाला मदत करायची हे डायरीत लिहिण्याची गरज नाही. प्रसंग समोर येईल तशी मदत करायची.. दुसऱ्यास सांगे ब्रह्मज्ञान स्वतः कोरडे पाषाण" असेही खूप लोक असतात. परंतु आपल्याला कोरडे पाषाण राहायचे नाही. आणि ब्रह्मज्ञान ही सांगायचे नाही. तर आपल्याला एक मदतनीस व्हायचे आहे गरजूंसाठी. ज्यांना आपली गरज आहे अशांच्या जवळ जा.त्यांची प्रेमाने चौकशी करा. त्यांच्याशी दोन शब्द गोड बोला. ज्यांच्याकडे खूप काही आहे त्यांच्याकडे आपल्याला जाण्याची गरज नाही. आणि त्यांनाही आपली गरज नसते. ज्यांना काहीच नाही ज्यांना आपण हवं आहोत अशा लोकांच्या जवळ जा, थांबा, बोला, त्यांची आपुलकीने चौकशी करा. हेच आपल्यातले देवत्व आहे. नसता आपल्यातील माणुसकी लोप पावत चालली आहे असं वाटतं. माणूस जिवंत आहे तोपर्यंतच त्याला भावना,प्रेम ,माया, आपुलकी या गोष्टी आहेत. जेव्हा आत्माच माणसातून निघून जातो तेव्हा त्या निर्जीव शरीरात काहीही राहत नाही. मग आपल्यालाही कोणाकडे जाता येत नाही. आणि कोणी आपल्याकडे येत नाही. आला तर दोन घटकासाठी आपल्याला निरोप देण्यासाठी येतो. या निरोपासाठी का होईना असंख्य लोकांनी यावं असं आपलं कार्य असावं. जाताना खूप संपत्ती नाही कमवता आली तरी चालेल. परंतु कित्येक लोकांच्या हृदयात आपले स्थान,आपले कार्य, आपलं प्रेम, आपलं नातं निर्माण करता आलं तरच खरं या माणसाचा जन्म सार्थक झाला असं म्हणावं. आणि याच गोष्टीचे चिंतन करण्याची आज खरी गरज आहे .प्रत्येकाने झोपताना किमान दोन मिनिटं तरी चिंतन करावे. चला आज एक छान चिंतन झालं....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-७

# निरूपण

आधुनिक केसरी

अमृतांशुस्वसारं त्वां पापापहारिणीं
शुभाम्| दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां
देवीं नमाम्यहम्|| ४९ || चंद्राची बहिण
असणाऱ्या, पाप हरण करणाऱ्या अशा तुला
शुभेला दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी
दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

# घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

ज्ञान जिवन परकाश है,
कर्म भक्ति का रुप । ज्ञानहीन नर अन्ध है,
परै महा भवकूप ।।०७।।(स्ववेंद चतुर्थ मण्डल
चतुर्थ अध्याय) ०४/०४/०७

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ज्ञान जीवनाचा प्रकाश आहे. ज्ञानाद्वारेच कर्म आणि भक्तीचे स्वरूप जाणले जाते. ज्ञानहीन अंध जीवन अपार संसार धारेत पडून नष्ट होते. ज्ञानाने जीवन प्रकाशित होऊन यथार्थ तत्व जाणल्यामुळे मोह, शोकरहित होउन जाते.



स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

बैसवुनि फेरी । गडियां मध्यभागीं हरी । अवघियांचें करी । समाधान सारिखें ॥१ ॥
पाहे तो देखे समोर । भोगी अवघे प्रकार । हरुषें झेली कर । कवळ मुखीं देती ते ॥ध्रु.॥
बोले बोलतिया सवें । देतील तें त्यांचें घ्यावें । एक एका ठावें । येर येरा अदृश्य ॥२ ॥
तुका म्हणे देवा । बहु आवडीचा हेवा । कोणाचिया जीवा । वाटों नेदी विषम ॥३ ॥
आम्हां निकट वासें । कळों आलें जैसें तैसें । नाहीं अनारीसें । कान्होबाचे अंतरीं ॥१ ॥
पीडती आपुल्या भावना । जैसी जयाची वासना । कर्माचा देखणा । पाहे लीळा कौतुक ॥ध्रु.॥
खेळ खेळे न पडे डाईं । ज्याचा भार त्याच्या ठायीं । कोणी पडतील डाईं । कोणी कोडीं उगवीती
॥२ ॥ तुका म्हणे कवळ । हातीं घेऊनि गोपाळ । देतो ज्यांचें बळ । त्यांसि तैसा विभाग ॥३ ॥
काम सारूनि सकळ । आले अवघे गोपाळ । जाली आतां वेळ । म्हणती आणा सिदोऱ्या ॥१ ॥

# चतुर बिरबल

आधुनिक केसरी

एके दिवशी, एक श्रीमंत व्यापारी बिरबलकडे आला आणि म्हणाला, माझ्या घरी कोणीतरी चोरी केली व माझे दागिने चोरले आहेत. माझ्या घरी एकूण दहा नोकर आहेत. त्यांच्यापैकीच कोणीतरी ते चोरले असल्याचा माझा संशय आहे. मी त्यांच्यापैकी सगळ्यांना विचारले, पण त्यातील एकही कबूल झाला नाही. कृपा करून तुम्ही यातून काहीतरी मार्ग काढा.


बिरबल त्या श्रीमंत व्यापाऱ्याच्या घरी गेला. त्याने त्या दहाही नोकरांना एकत्र बोलावले व त्यांना म्हणाला, की माझ्याकडे दहा जादूच्या काठया आहेत. त्या मी तुम्हाला देत आहे. या काठयांचे वैशिष्टय म्हणजे सर्व काठया समान आहेत. मी त्या तुम्हाला देत आहे. आज तुमच्याकडे ठेवा व उदया मला परत करा. ज्याने चोरी केली असेल, त्याची काठी रात्रीत एक इंचाने वाढेल.

दागिने चोरणारा नोकर घाबरला. आपली चोरी पकडली जाईल म्हणून तो काठी एक इंचाने कापतो. त्याला वाटते की सकाळी ती परत एक इंचाने वाढेल व कुणाला काही कळणार नाही. दुसऱ्या दिवशी बिरबलाने नोकरांच्या हातातील काठया पाहिल्या. त्याला एका नोकराची काठी छोटी झाल्याचे आढळले. त्याच्याकडे बोट दाखवत बिरबल म्हणाला, 'हा नोकर चोर आहे. त्यानेच तुमचे दागिने चोरले आहे.'

# नमस्कार तया ब्रह्मचैतन्यमूर्ति

आधुनिक केसरी

सदगुरुंची प्राप्ती झाल्यानंतर 'गुरुसेवा' करणे हे शिष्याचे परमकर्तव्य आहे. गुरुसेवा म्हणजे त्यांची आज्ञा पाळणे. मनात कोणताही किंतू न ठेवता, विकल्प येऊ न देता त्यांनी सांगितलेली साधना नित्यनियमाने प्रेमाने करावी. तसेच साधकाची संपूर्ण शरणागती असावी. शरण जाणे म्हणजे १) सदगुरु ठेवतील त्या अवस्थेत समाधानात राहणे. २) त्यांच्या इच्छेत आपली इच्छा मिसळणे. ३) कोणत्याही परिस्थितीत नाम घेण्याचे सोडू नये. ४) नामावर, सदगुरूवर पूर्ण विश्वास, श्रद्धा ठेवणे. त्यांनी सांगितलेले साधन न करता इतर साधन केल्यास वृथा कष्टच होतील आणि पदरात काही पडणार नाही. सदगुरुंना जे शरण जातात त्यांचा कार्यभार सदगुरु उचलतात. त्यांच्या मागे-पुढे उभे राहून ते सत्तारूपाने त्यांना मदत करतात. सदगुरु नावाड्याचे काम करतात. आपली जीवनरूपी नौका योग्य दिशेला घेऊन जातात. भगवंताच्या आशीर्वादानेच आपली सदगुरुंशी भेट होते व सदगुरुंकडे नाम मिळाल्यानंतरच ईश्वराच्या व्यापक स्वरूपाची महती कळते.



सदगुरुंचे 'अनुसंधान' राखणे महत्त्वाचे. कोणतेही प्रापंचिक काम करत असताना सदगुरुंवर मन एकाग्र करणे यालाच अनुसंधान असे म्हणतात. सदगुरुंना दृष्टीआड होऊ न देणे म्हणजेच अनुसंधान. अनुसंधान ठेवण्यासाठी त्यांनी दिलेले नाम नियमितपणे घेणे. प्रपंच करताना आपले लक्ष मात्र सदगुरूंच्या चरणी असावे. ते म्हणजेच अनुसंधान. जिथे आपले समाधान होते, संशय, शंका फिटतात तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद, गुरुतत्व सर्व ठिकाणी एकच असते म्हणूनच - ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे । त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे । मी ठेविते मस्तक ज्या ठिकाणी । तेथे तुझे सदगुरु पाय दोन्ही ॥

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

प्रत्येक शरीराचे काही विशिष्ठ कंपने असतात व त्या नुसार त्या शरीरावर ह्या श्रुष्टीतील बऱ्या वाईट गोष्टी अवलंबून असतात त्यानुसारच स्वभाव, आवडीनिवडी, अवलंबून असते. हे शास्त्र फक्त सद्गुरूंनाच कळत असल्याने त्याला अनुरूप असेच नाम /मंत्र ते देत असतात किंवा सदगुरु जे काही सांगतात ते आपल्या शरीराच्या कंपनाशी सुसंगत असल्यानेच त्यांच्या आज्ञा पाळणाऱ्यावर लगेच अपेक्षित परिणाम होण्यास सुरवात होत असते आणि या प्रवाहात आल्या नंतर खरे तर तेच सर्व करून घेत असतात.संतांच्या कृपेने दुखणे बरे झाले म्हणून त्याला मानणे हे खरे नव्हे. जो शिष्याला विषयात ओढील त्याला गुरू कसे म्हणावे ? जो काही चमत्कार करून दाखवील त्याला आम्ही बुवा म्हणतो. संताची परिक्षा आम्ही बाह्यांगावरून करतो. सर्वांभूती भगवंत ज्याला पाहता येईल त्याला संताची खरी ओळख होईल. क्रमशः

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

परोपदेशे पाण्डित्यं सर्वेषां सुकरं नृणाम् ।
धर्मे स्वीयमनुष्ठानं कस्यचित्तु महात्मनः ॥

सरलार्थ – सर्व माणसांना दुसऱ्या माणसाला उपदेश करणे सोपे असते. (पण ) स्वतः धर्माचे आचरण करणे ही गोष्ट कोण्या महात्म्याच्याच बाबतीत दिसून येते.

स्पष्टीकरण – प्रत्येक मनुष्याला 'तू असे कर, तू तसा वाग' असा दुसऱ्याला उपदेश करणे सोपे असते. त्यात स्वतःला कसलीच तोशीस लागत नाही. पण उपदेश करतोस, पण तू स्वतः तसा वागतोस का ?' असे एखाद्याने विचारले तर ? तिथे वाचा मुकी होते. कारण धर्माचे, नीतीचे आचरण कठीण असते. सामान्य माणसांची त्याकडे प्रवृत्ती वळत नाही. असा एखादाच पुरुष, की जो दुसऱ्याला उपदेश करतो, त्याप्रमाणे स्वतः वागतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २५ जुलै २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# बलवान तरुण पिढी घडवण्यासाठी मैदानी खेळ आवश्यक

## आजिनाथ एखंडे : स्व.मोहनलालजी बियाणी व्याख्यानमालेला पांडुरंग इंग्लिश स्कूल येथे उत्स्फूर्त प्रतिसाद





आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** बलवान तरुण पिढी घडवण्यासाठी मैदानी खेळ आवश्यक असल्याचे प्रतिपादन आजिनाथ एखंडे यांनी केले. वैजापुर तालुक्यातील तलवाडा येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व पांडुरंग इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक स्व. मोहनलालजी बियाणी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित मासिक व्याख्यानमेत मैदानी खेळाचे महत्त्व या विषयावर योग गुरु आजिनाथ एखंडे यांनो मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी डॉ.प्रभू गोरे, शांताराम मगर, संजय व्यापारी, प्रा. संतोष सुर्यवंशी, संदिप घंटे. राधाकृष्ण सोनवणे, भिकन सोमासे, सोमनाथ तांबे,जगदिश निकम, दादाभाऊ तांबे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना एखंडे म्हणाले की, आपल्या देशात शूर- वीर यांनी मैदानी खेळ आणि योगसाधना याच्या ताकदीवर साम्राज्य उभे केले. जिजामाता,शिवाजी महाराज.संभाजी संभाजी, राणी लक्ष्मीबाई यांनी मनगटाच्या ताकतीवर आपली ओळख अणि नाव इतिहासत कोरले.शासनस्तरावर मैदानी खेळांना आधिक प्रोत्साहन देऊन मैदानी खेळांना राजाश्रय मिळायला हवा,अशी आशा शेवटी योगुरु आजिनाथ एखंडे व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईनाथ वाघ यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. संतोष सूर्यवंशी यांनी केले आभार भिकन सोमासे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राणी सुर्यवंशी,दिपाली तळेकर, निखिल वाघ,किर्ती कुन्दे,तनुजा कुन्दे,कविता निकम,योगिता सोनवणे, बाबासाहेब सुर्यवंशी,संतोष हराळ, विनोद त्रिभुवन यांनी परिश्रम घेतले.

**मुलांचे आरोग्य सुदृढ ठेवणे शाळांची जबाबदारी :** मुलांना मैदानावर विविध खेळ शिकवून मुलांचे आरोग्य सुदृढ ठेवणे ही जबाबदारी शाळांची आहे . त्यासाठी सर्व शाळांना खेळाचे मैदान आणी प्रशिक्षित खेळाचे शिक्षक असणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन प्राचार्य संतोष सूर्यवंशी यांनी केले .

**मैदानीखेळावर भर देणे आवश्यक :** शहरी व ग्रामीण भागातील मुलांनाशिकवणी, संगणक, टी .व्ही . मोबाईल गेम यामध्येच गुंतवून ठेवले जात आहे . हो परिस्थिती बदलण्यासाठीमैदानीखेळावर भर देणे आवश्यक आहे,असे मत डॉ . प्रभू गोरे यांनी व्यक्त केले .

**पूर्वीचे खेळ ईतिहास जमा होण्याच्या मार्गावर :** संगणक, मोबाईल, टीव्हीमुळे मैदानीखेळांचा विसर पडत चालला आहे .पुर्वीचे विटीदांडु, सुरपारंब्या, चिलापाट्या, लपाछपी, कब्बडी,खो- खो हे खेळइतिहासजमा होत आहेत . काही वर्षांपूर्वी शहरातील मुलांना सुट्टीच्या दिवशी खेड्यात जायचे म्हटले की धमाल वाटायची .शहरात गुदमरून राहत असलेली मुले खेड्यात बिनधास्तखेळायची . झाडावर चढणे, नदीवर पोहायला जाणे, रात्री अंधारात लपाछपीखेळणे अशा प्रकारचे अनेकखेळदिवसभर चालायचे .हे सर्व खेळ इतिहासजमा होत आसल्याची खंत शांताराम मगर यांनी व्यक्त केली .



# ईसारवाडी येथील घटनेच्या निषेधार्थ मराठा समाजाचा विराट मूक मोर्चा

## आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील ईसारवाडी येथे जातीवादाच्या मानसिकेतून बळी गेलेला मयत महेश गोरक्षनाथ बोबडे यांच्या मृत्यूस कारणीभूत आरोपीवर कठोर कारवाई करण्यात यावी, यासह विविध मागण्यासाठी मराठा क्रांती मूक मोर्चा पैठणच्या वतीने विराट मोर्चा दिनांक 24 जुलै रोजी काढण्यात आला.

मोर्चाची सुरुवात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे मयत महेश बोबडे यास अभिवादन करून करण्यात आली. तद्नंतर महाराणा प्रताप चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महात्मा फुले चौक, बसवेश्वर चौक येथे अभिवादन करुन तहसील येथे मोर्चा धडकला. तहसीलदार उपस्थित नसल्याने नायब तहसीलदार यांना ईसरवाडी येथील घटनेबाबतचे निवेदन सुपूर्त केले. निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या. मयत महेश बोबडे या मराठा तरुणाच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी खटला फास्टट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा, मयत महेश बोबडे यांच्या पिढीत कुटुंबाला शासन स्तरावरून आर्थिक मदत जाहीर करावी व कुटुंबातील एक व्यक्ती शासन सेवेत घ्यावी, ॲट्रॉसिटी कायद्याचा जो गैरवापर करत असेल त्यांच्या विरोधात कारवाई करण्याची तरतूद करावी. ॲट्रॉसिटी कायदा कारवाई न करणाऱ्या पोलीस अधिकारी यांना सहआरोपी करण्याची जाचक अट रद्द करण्यात यावी. कलम 18 अन्वये गुन्हा दाखल होतात तात्काळ अटक न करता, प्राथमिक चौकशीत दोषी आढळल्यानंतरच अटकेचा पर्याय अशी तरतूद करण्यात यावी. ॲट्रॉसिटी गुन्हा नोंदविण्यामागे वाईट हेतू किंवा बदनामी चा प्रयत्न असेल तर अटकपूर्व जामीन दिला पाहिजे. सदर प्रकरणात सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करावी. आदी मागण्याचे निवेदन तहसील कार्यालयामार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना देण्यात आले. मयत महेश बोबडे यास भावपूर्ण श्रद्धांजली वाहून राष्ट्रगीताने मुक मोर्चाचा शेवट करण्यात आला. यावेळी हजारोंच्या संख्येने मराठा बांधव या मोर्चात सहभागी झाले होते. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार याच्या मार्गदर्शनाखाली पैठण उपविभागीय पोलिस अधिकारी सिद्धेश्वर भोरे, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश वाघ, सपोनी लक्ष्मण केंद्रे, उपनिरीक्षक सतीश भोसले, दशरथ बुरकुल यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.



# खळबळजनक दावा

आधुनिक केसरी

राजस्थान विधानसभेत मुख्यमंत्री अशोक गहलोत यांचे सरकार त्यांच्याच एका सहकाऱ्यामुळे सध्या अडचणीत आले आहे. सरकारच्या विरोधात भाष्य केल्यानंतर शुक्रवारी (दि. २१ जुलै) राज्यमंत्री राजेंद्र सिंह गुढा यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्यात आली. उदयपुरवाटी विधानसभा मतदारसंघाचे आमदार असलेल्या राजेंद्र सिंह गुढा यांनी आता सरकारविरोधात आणखी एक मोठा आरोप केला आहे. राजस्थान विधानसभेत लाल रंगाची डायरी आणून त्यातील मजकूर वाचून दाखविण्याची विनंती आमदार गुढा यांनी केली. मात्र त्यांना बोलण्याची परवानगी दिली नाही. त्यानंतर विधानसभेतच इतर काँग्रेस आमदारांसमवेत त्यांची झटापट झाली. सोमवारी (२४ जुलै) आमदार गुढा यांना विधानसभा सभागृहातूनही बाहेर काढण्यात आले, मार्शलचा आधार घेऊन त्यांना सभागृहात येण्यास मज्जाव करण्यात आला आहे. मणिपूरमधील आदिवासी महिलांवरील अत्याचारानंतर भाजपा सरकार अडचणी आले असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थान आणि छत्तीसगडच्या कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित केले. भाजपाच्या या आरोपाचा आधार घेऊन राज्यमंत्री राजेंद्र सिंह गुढा यांनी स्वपक्षाच्या सरकारवरच आरोप केले होते. त्यामुळे मुख्यमंत्री गहलोत यांनी त्यांची हकालपट्टी केली. या हकालपट्टीनंतर रविवारी गुढा यांनी लाल डायरी बाहेर काढण्याचे सुतोवाच केले. ते म्हणाले की, २०२० साली काँग्रेसचे सभागृह नेते धर्मेंद्र राठोड यांच्या निवासस्थानी प्राप्तिकर विभागाने धाड टाकली होती, तेव्हा अशोक गहलोत यांच्या सूचनेवरून त्यांनी धाडीदरम्यान ही लाल डायरी मिळवली होती. रविवारी झुंझुनूं जिल्ह्यात एका कार्यक्रमात बोलत असताना गुढा म्हणाले की, जर मी ही डायरी मिळवली नसती तर तेव्हाच गहलोत तुरुंगात गेले असते. २०२० साली काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांनी गहलोत यांच्याविरोधात बंडाचे निशाण फडकवले होते. धर्मेंद्र राठोड हे मुख्यमंत्री गहलोत यांचे अतिशय निकटवर्तीय समजले जातात. गुढा यांनी रविवारी २०२० च्या प्रसंगाची सविस्तार माहिती देताना सांगितले, मुख्यमंत्रीजी मी जर त्यावेळी नसतो, तर तुम्ही तुरुंगात गेला असता... त्यावेळी तुम्ही मला म्हणाला होतात की, गुढा, आता सर्वकाही तुझ्या हातात आहे. मी १५० सीआरपीएफ जवानांना चकवा देऊन नवव्या मजल्यावर पोहोचलो होतो आणि गेट तोडून ती लाल डायरी मिळवली होती, गहलोत साहेब जर मी नसतो तर तुम्ही आता मुख्यमंत्री नसता आणि तुरुंगात गेला असतात. गुढा यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी केल्यानंतर ते लाल डायरीचा संदर्भ देत आहेत. मी डायरी मिळवल्यानंतर ती जाळली की नाही? याबाबत गहलोत यांनी अनेकदा विचारणा केल्याचेही गुढा यांनी सांगितले. गुढा पुढे म्हणाले की, मागच्या वर्षी मुख्यमंत्री गहलोत यांच्या वाढदिवसानिमित्त जाहीर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सर्व पाहुण्यांसमोर गहलोत म्हणाले होते, "जर गुढा नसते तर मी मुख्यमंत्री नसतो आपण मणिपूरवर बोलण्याऐवजी राजस्थानमध्ये महिलांवर अत्याचार होत आहेत, त्याबाबत आत्मपरिक्षण केले पाहीजे", असे वक्तव्य गुढा यांनी राजस्थान विधानसभेत केले होते, त्यानंतर मुख्यमंत्री गहलोत यांनी त्यांची हकालपट्टी केली.

# मोबाईलपासून लेकरं चार हात दूर ठेवा



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी


**आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने होत असलेली वाटचाल लाभधारक वाटत असली तरी करोना संकटापासून सुरू झालेला ऑनलाईनचा जमाना ज्या विळख्यात लेकरं आडकली असुन समाज व्यवस्थेला भविष्याच्या दृष्टीने फारच मोठा धोका म्हणावा लागेल.काळाची गरज म्हणुन ऑनलाईन शिक्षण आलं पण त्याला चिकटुनच लेकरं राहिली. ज्याचे परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर होताना दिसतात. शाळेत जायचं वय झाल्यानंतर लेकराची शाळा सुरू होते. पण आता खऱ्या अर्थाने पालकांनी सावध होवुन पहाटच्या शाळा मोबाईलविना घरी करण्याची गरज वाटते. ज्यांचे पालक सावधान, त्यांची लेकरं छान छान असं म्हणायला आता हरकत नाही. मोबाईल कचाट्यातून मुक्ती मिळण्यासाठी पालकांनीच दक्ष रहाण्याची गरज वाटते. मोबाईलच्या ठोकड्याला खेळणी समजुन पाळण्यातल्या लेकराला देखील आई जेव्हा मोबाईल हातात देते तेव्हा आपणच आपल्या लेकरांचं नुकसान किती करू लागलो? हे न सांगणे बरे.**

करोनासारख्या काळात ऑनलाईन शिक्षणाच्या नादात विद्यार्थ्यांच्या गळ्याभोवती मोबाईलचा विळखा ( फास ) कमी होण्यापेक्षा वाढत जाताना दिसतो. ज्याचे दुष्परिणाम आरोग्यावर आणि मानसिकतेवर मोठ्या प्रमाणावर व्हायला लागले. लेकरांवर आलेले हे फार मोठं संकट असुन ज्यातुन बाहेर पडण्यासाठी शाळा शिक्षकावर अवलंबुन रहावे असं जर पालकांना वाटत असेल तर तो चक्क मुर्खपणा आत्मघातकीपणाचा म्हणावा लागेल. एखादी सवय भारतीयांना लागल्यानंतर जंगलाला आग लागल्याप्रमाणे अंगवळणी पडते. जो काळ संपर्काचा पोस्टमेनवर होता. त्या अगोदरही प्राण्याच्या चोचीत पत्र पाठवण्याची प्रक्रिया कदाचित मैने प्यार किया चित्रपटातुन सर्वांनीच पाहिली. अनेक संकल्पांना कधीतरी गावाकडचा माणुस आला तरी माहेरच्या माणसाकडून निरोप येत असे. बाजारात कुणी भेटलं तर खुशालीचा निरोप. कोणत्या दिशेला आभाळ उठलं ? तिथपासुन हवामानाचा अंदाज अगदी मामाचं गाव, उन्हाळी सुट्या, खेळणे, बागडणे या साऱ्या रूढी परंपराच्या गोष्टी वर्तमान सामाजिक व्यवस्थेत बंद झाल्या. पुरातन काळात श्रीकृष्ण मैदानी खेळ खेळताना कबड्डी, हुतुतु, सुरपाट्या कलियुगात देखील कालांतराने सुरू होत्या. मग कुस्ती खेळ असतील, व्यायाम अगदी नदी, नाले, विहीरीत पोहणं या सर्व गोष्टी लुप्त पावल्या. जुनं ते सोनं कालपरत्वे पुन्हा परत येईल तो भाग वेगळा. पण जुना जमाना गेला आणि मोबाईल ठोकड्याचा व्हॉटसअप जमाना आला असं म्हणायला हरकत नाही. पुर्वी लोकांच्या भेटी व्हाव्यात म्हणुन घराबाहेर पडायचं, राम राम, चहा पाणी आवक जावक, संवाद या साऱ्या गोष्टी असायच्या. त्यालाही तिलांजली मिळाली असुन व्हॉटसअप गुड मॉर्निंग चित्रातुन पाठवलेला चहाचा कप दोन हात जोडलेले नमस्कार ही संस्कृती पुढे आली. एवढेच नव्हे तर लोकांच्या मनामनात रूजली असुन प्रत्येकजण ठोकड्याच्या मोहात पडून आपलं आयुष्य जणु काही ठोकडाच असं समजत जीवन जगताना दिसु लागला. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची प्रगती वाईट आहे असं मत आमचं मुळीच नाही. त्याहुन अधिक मोबाईल देखील वाईट असं मत आमचं मुळीच नाही. पण या साधनाच्या आहारी पडून जो तरूणाईचा विशेषतः अविवेक हरवत जात आहे. ज्याचं व्यसन लागल्यासारखं साधनाच्या हेडीक लोक बनु लागले ज्यामुळे माणसाची माणुसकी जिवंतपणाची रहात नसुन जीव असलेली माणसं मृतात्म्यासारखी वागु लागली. असो. अनेक धोके असु शकतात. काही चांगल्याही गोष्टी असु शकतात पण सर्वात धोक्याची गोष्ट म्हणजे या ठोकड्यापासुन पोटच्या लेकराला काही दिवस मुक्त करण्याची वेळ आली.करोनासारख्या संकटात ऑनलाईन शिक्षणाची गरज पडली म्हणून प्रक्रिया पुढे आली. त्यातुन ठोकड्यावरचा अभ्यास पहाटे सुरू झाला. तो आजही तसाच आहे. त्या चक्रव्युहात लेकरं आडकुन पडली. गंमत बघा, अभ्यासासाठी पहाटे लेकराला उठवायचं आई-वडिलांचं काम असतं. पुर्वी अशाच पद्धतीने अभ्यास घरच्या शाळेत घेतले जाई. पण आता पहाटे उठून लेकरू हातात मोबाईलचं ठोकडं घेवुन बसलं की आई-वडिलांना वाटतं मोबाईलवर अभ्यास लेकरू करतंय. हा गैरसमज जन्मदात्याच्या भविष्यासाठी देखील धोक्याचा असुन लेकरांच्या भविष्यासाठी चांगला नाही. पहाटे पुस्तक स्मरण करून वाचणं किंवा लिखाण करणं या गोष्टी पुनर्जिवीत व्हायला हव्या. किमान पहाटे पाच ते शाळेतुन लेकरं परत येईपर्यंत नाही म्हटलं तरी इयत्ता 7वी पर्यंतच्या मुलांच्या हातात मोबाईल देता कामा नये. अंधारात मोबाईलचा उजेड



धोक्याचा मानसिक ताण वाढले, डोळ्यावर परिणाम होवु लागले. सहज उदाहरण म्हणून बघा एखादा मुलगा कानात हेडफोन ऐकून अभ्यास करत असेल ( असं समजु. ) पण तो त्या नादात एवढा असतो घरात चोरी झालेली देखील लेकराला कळत नाही. पहाटे उठून मैदानावर कुणी जाईना. कदाचित लेकरं गेले तर मोबाईलचे गाणे लावत बसतात. सुर्यनमस्कार, बैठका या गोष्टी बाजुला राहिल्या. आईनं जेवणाचं ताट समोर आणलं तरी अर्धा अर्धा तास मोबाईलमधील डोकं बाजुला निघत नाही. हा खरा समाज व्यवस्थेला उद्याच्या फार मोठा धोका म्हणावा लागेल. अतिवापरामुळे काय परिणाम भोगावे लागतात ? हे प्रत्येक घराघरात आई-वडिलांना माहितीय. जास्त खोल जाण्यापेक्षा पालकांनीच आता आपल्या जन्मदात्या मुलांच्या शाळा घरामध्ये चालु करण्याची गरज वाटते. पहाटे उठावं, संध्या, स्नान व्यायाम, पुजा, विधी, वाचन, लिखाण या गोष्टी मुलांकडून करून घेण्याची गरज निश्चित आहे. शाळेतलं शिक्षण शाळेत होईल पण जर पालक सावध झाले तरच आपले लेकरं आणि भविष्य सुरक्षित राहिल हे मात्र नक्की. किमान पहाटपासून तरी लेकरांच्या हाती मोबाईल न देता त्याच्याकडून उल्लेख केल्याप्रमाणे ज्ञानार्जन घडवून आणणे महत्वाचे वाटते. ठोकड्याच्या नादात अनेक कुटुंबात मातृ देवता देखील लेकरांकडे दुर्लक्ष करताना दिसतात. टिव्हीच्या मालिका आणि मोबाईलवर व्हॉटस अप चॅटींग या प्रेमात माता भगिनी पडल्यामुळे ज्या पद्धतीने लेकराकडं लक्ष द्यायला हवं तिथं लक्ष जाईनाच. मुलगा जर शाळातुन आला तर पुर्वी आज गुरूजींनं काय शिकवलं ? एवढं आई विचारायची. आजच्या परिस्थितीत टिव्हीच्या मालिका आणि हातातलं ठोकडं हे सोडून आईला देखील लेकरू शाळेतुन कधी आलं ? त्याने स्वच्छता केली का नाही ? जेवणं केलं का नाही ? शाळेत काय ज्ञानार्जन केलं ? हे विचारायला वेळच मिळत नाही. या चक्रव्युहात केवळ मुलं मुलीच आडकल्या असं नव्हे तर दस्तुरखुद्द आई-वडिल देखील आडकले असुन ज्याचे अत्यंत धोके समाज व्यवस्थेला होवु लागले. खरं म्हणजे सरकारने आता कायद्यानेच मोबाईल वापरावं योग्य वयानुसार बंदी आणण्याची गरज वाटते. पण काही गोष्टी जेव्हा माता-पित्यांच्या हातात असतात तेव्हा कायद्याची वाट न पहाता आपणच आपल्या घरामध्ये सावध रहाताना लेकरांना मोबाईल कचाट्यातुन मुक्त करणे काळाची गरज वाटते. ऑनलाईन जमान्यात सारंच ऑनलाईन घडत असेल तर मग लाईन जुळेल पण आयुष्य टिकणारं कधीच नसेल हे त्रिवादी सत्य म्हणुन पालकांनो, सावध व्हा, आत्मपरीक्षण करा आणि पहाटची शाळा घरी चालु करताना त्या ठोकड्यापासुन लेकराला बाजुला करत दिवा बत्तीसमोर ज्ञान प्राप्ती करून द्या आणि ज्यांनी हे सारं हाती घेतलं त्या माय-बापाच्या संसार जीवनाचं सार्थक निश्चित होईल यात शंका नाही.

# मणिपूरची हिंसा देशाला व मानवतेला काळीमा फासणारी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**रामायण व महाभारत काळापासून हरण आणि वस्त्रहरण हे दोन शब्द रूढ आहेत. या दोन्ही शब्दाचा अर्थ अगदी सरळ सरळ आहे. प्रदीर्घ काळापासून हे दोन्ही शब्द फारसे ऐकण्यात येत नाहीत. केव्हातरी समाजकारणात जुनेजाणते लोक याचा आजही उपहासाने उल्लेख करतात. विशेषतः आजची तरुणाई तर इंग्रजी आणि सेमी इंग्रजीत शिकत असल्यामुळे अशा शब्दाकडे ढुंकूनही बघत नाहीत. अशा व्यावहारिक शब्दार्थाकडे त्यांचे लक्षही जात नाही. वर्तमानात सर्वत्र घरादारापासून ते गल्लीबोळात या इंग्रजीचा बोलबाला असल्यामुळे सर्वत्र माय मराठीचा विसर पडत आहे. इंग्रजी भाषा परिपूर्ण येवो अथवा न येवो परंतु अशिक्षित लोकही मराठीला पायदळी तुडवून सर्रासपणे विसरून हॅलो-हाय-फाय ची संस्कृती मोठ्या प्रमाणात रूढ होत आहे . समाजाचे काही का असेना, काही का होईना परंतु आपल्या महाराष्ट्रातील वर्तमान राजकारणी लोकांनी फोडा-झोडांची संस्कृती अंगीकारून हरण आणि वस्त्रहरण या शब्दाला उधाण आणले आहे. ल्या दोन महिन्यांपासून मणिपूरमधील हिंसा अती टोकाला पोहचली असुन भयावह स्थिती निर्माण झाली आहे.**

मुख्यत्वेकरून हिंसेची सुरूवात तेव्हा निर्माण झाली जेव्हा कुकी समुदायाने पहाडी जिल्ह्यात "आदिवासी एकजुटता मार्च"काढण्यात आल्या आणि मैतेई समुदायाचे अनुसूचित जनजातिमध्ये सहभागी केल्या जाण्याच्या मागणीचा विरोध करण्यात आला.कारण मणिपूरची लोकसंख्यामध्ये मैतेई समुदायाची संख्या 53 टक्के आहे.हा समुदाय जास्ततर इंफाळ घाटीमध्ये रहातो व कुकी आणि नगा आदिवासींची संख्या 40 टक्के आहे व जास्ततर पहाडी विभागात रहातात.यातुनच या संघर्षाला सुरुवात झाली.याचे पडसाद देशातच नाही तर जगात उमटल्याचे दिसून येते.संपूर्ण देशाला हादरवून टाकणारे मणिपूरमधील धिंड प्रकरण ज्या दिवशी घडले त्याच दिवशी राज्यातील कांगपोकपी जिल्ह्यात आणखी दोन तरूणींना पाशवी हल्ला करून ठार करण्यात आले होते अशी माहिती समोर आली आहे.तरीही मणिपूरमधे हिंसा थांबण्याचे नाव नाही.आता नुकताच घडलेली घटना म्हणजे चुराचांदपुरमध्ये दोन गटांमध्ये संघर्षमय तनाव निर्माण होवून फायरिंग झाल्याची घटना सामोरं आली आहे.गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या जातीय हिंसेच्या काळात आतापर्यंत 150 पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झालेला आहे व मोठ्या संख्येने लोक गंभीर जख्मी झाले आहेत.यावरून स्पष्ट होते की कुकी समुदाय व मैतेई समुदाय यांच्यात चांगलेच वैरत्व निर्माण झालेले आहेत.म्हणजेच आजच्या परिस्थितीत मणिपूरमधील हिंसा थांबता-थांबेना यामुळे कायदा सुव्यवस्था पुर्णपणे कोलमडल्याचे स्पष्ट दिसुन येते. त्याचप्रमाणे मणिपूर घटनेवर पक्ष-विपक्षाकडुन मोठ्या प्रमाणात राजकारण होतांना दिसत आहे व आपापली पोळी शेकत आहे. अशा परिस्थितीत मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करून हिंसाचार आटोक्यात आणला पाहिजे. कारण मणिपूरमधील घटना दिवसेंदिवस राज्य सरकारच्या आवाक्या बाहेर जातांना दिसत आहे व या आगीत राजकीय पुढारी तेल ओतन्याचे काम करीत आहे.त्यामुळे देशात कधी न पहालेली घटना मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या रूपात आपल्याला दिसून येते व हा वनवा वाढण्याची शक्यता आहे.यावर वेळीच लगाम कसला नाही तर अनर्थ होऊ शकतो याला नाकारता येत नाही.कारण आज संपूर्ण देशात सतत पावसामुळे अनेक राज्य महापुरामुळे अत्यंत कठीण परिस्थितीत आहे तर दुसरीकडे मणिपूरमधील हिंसाचाराचा वनवा शर्मशार करणारा आहे.यावर पडदा टाकण्याकरीता ताबडतोब राष्ट्रपती राजवट लावने गरजेचे आहे.यामुळे राजकारण्यांचे राजकारण करने कमी होईल व देशात पावसाने केलेला कहर व हाहाकार याकडे लक्ष देता येईल.कारण मणिपूरमधील घृणास्पद व शर्मशार करणारी घटना गल्ली पासून तर दिल्ली पर्यंत आणि दिल्ली पासून देशाच्या बाहेर पसरलेली आहे. त्यामुळे या घटनेला अंकुश ( ब्रेक ) राष्ट्रपती राजवट मार्फतच लागु शकते.त्यामुळे महामहीम राष्ट्रपती महोदयांना विनंती करतो की या घटनेवर जातीने लक्ष केंद्रित करून राष्ट्रपती राजवट लागू करण्यास प्रथम प्राधान्य द्यावे व ताबडतोब शांतता प्रस्थापित करावी. मणिपूरमधील हिंसाचार सुरू असतांना बाजूचे राज्य मिझोराममधील मैतेई समुदायाला मणिपूर सोडण्याची धमकी मिळत आहे. त्यामुळे मिझोराममध्ये रहात असलेले मैतेई समुदायाला हवाईमार्गाने आणन्याचा प्रयत्न सुरू आहे. यावरून स्पष्ट होते की मणिपूर-मिजोरमची परिस्थितीत चिघळलेली आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.मैतेई समाजाला धमकी दिली जात आहे की "अपनी सुरक्षा प्यारी है तो मिजोरम छोड दें"कारण जातीय संघर्षामध्ये दोन महिलांना निर्वस्त्र धिंड काढल्याच्या घटनेनंतर मिजो युवकांमध्ये गुस्सा चरनसिमेवर पोहोचला आहे यामुळे हिंसा आणखी वाढू शकते.मिजोरमचा गैर राजनीतिक संगठन पीएएमआरए ने म्हटले आहे की मणिपूरमधील जो जातीय समुदाय ( कुकी-जो ) यांच्या सोबत झालेल्या हिंसेमुळे मिजोरमच्या भावना दुखावल्या आहेत.त्यामुळे पीएएमआरए संघटनेने चेतावनी दिली आहे की जर मिजोरम मधील मैतेई समाजावर जर कोणतीही हिंसात्मक कारवाई झाली तर याला जबाबदार स्वतः मणिपूर राहील. मिजोरमचे काही विद्रोही नेत्यांनी मैतेई समुदायाला मणिपूर सोडण्याची धमकी सुध्दा दिली आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वर्तमानपत्रांना जीएसटीच्या जाचक अटीतून मुक्त करा : चंदुलाल बियाणी

## असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर फ इंडियाच्या चर्चासत्राला मोठा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज



**परळी वैजनाथ :** लोकशाहीचा चौथास्तंभ म्हणून ओळख असलेल्या वर्तमानपत्रांना जीएसटीच्या जाचक अटीतून मुक्त करा असे आवाहन येथील दै.मराठवाडा साथीचे संपादक व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंदुलाल बियाणी यांनी येथे केले. असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया महाराष्ट्र, शाखा बीडच्या वतीने परळी वैजनाथ येथे रविवारी (दि.23) आयोजित करण्यात आलेल्या 'लघू व मध्यम वृत्तपत्रापुढील आव्हाने व समस्या' या विषयावर चर्चासत्राच्या उद्‌घाटन कार्यक्रमात श्री बियाणी बोलत होते.

परळी शहरातील नाथ रोड मार्गावरील वैद्यनाथ सहकारी औद्योगिक वसाहतीच्या सभागृहात रविवारी (दि.23) दुपारी हा कार्यक्रम झाला. व्यासपीठावर संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रदीण पाटील, प्रदेशाध्यक्ष प्रदीप कुलकर्णी, भाजपचे जेष्ठ नेते श्रीराम मुंडे यांच्यासह संघटनेचे गोरख तावरे, भिका चौधरी, ओमप्रकाश शिंदे, विलास कटयारे, बीड जिल्हाध्यक्ष लक्ष्मण वाकडे, परळी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष बालकिशन सोनी, शहराध्यक्ष जगदीश शिंदे, जेष्ठ पत्रकार आत्मलिंग शेटे आदी मान्यवरांसह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. या चर्चासत्रादरम्यान जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांनी भेट दिली व पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.

बियाणे म्हणाले, वर्तमानपत्राला लागणाऱ्या कागदावर जीएसटी आकरली जाते. यामुळे उत्पादन खर्च वाढतो, त्यामुळे वर्तमानपत्र वाचकांना देण्यात माफक दरात संपादकांना अडचणी येतात. जाहिरातीवर जी.एस.टी.आरकारली जात आहेत. जी.एस.टी.च्या जाचक अटीतून वर्तमानपत्रातून सुट द्यावी अशी असे आवाहन श्री बियाणी यांनी केले. वर्तमानपत्रापुढे असलेल्या विविध समस्यांमुळे आज वर्तमानपत्र काढणे अवघड झाले आहे. असे सांगून त्यांनी सोशल मिडियाचा प्रभाव वाढला तरी वर्तमानपत्राची विश्वासार्हता कायम असल्याचे सांगितले. श्रीराम मुंडे यांनी यावेळी बोलतांना समाजाला नवी दिशा देण्याचे काम वर्तमानपत्र करतात. लोकांचा वर्तमानपत्रावरील विश्वास कायम आहे, वर्तमानपत्रांनी आपली विश्वार्हता जपावी असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रीय राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रवीण पाटील यांनी लघू व मध्यम वर्तमानपत्रापुढील अडचणी व समस्या सोडविण्यासाठी संपादकांनी संघटित होवून लढा देणे गरजेचे आहे असे सांगितले. यावेळी नेताजी मेश्राम, श्री पितळे, प्रभाकर शिरुरे, आत्मलिंग शेटे, विलास कट्यारे आदींनी विचार मांडले. अध्यक्षीय भाषणात प्रदीप कुलकर्णी यांनी संघटनेच्या माध्यमातून माध्यमातून वर्तमानपत्रांच्या सोडविलेल्या प्रश्नाबाबत माहिती देवून संघटनेच्या कार्याचा आढावा मांडला. प्रास्ताविक बीड जिल्हाध्यक्ष लक्ष्मण वाकडे यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या अधिस्वीकृतीवर निवड झाल्याबद्दल श्री गोरख तावरे यांचा तसेच जिल्हा माहिती अधिकारी श्री दैठणकर यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन दै.मराठवाडा साथीचे कार्यकारी संपादक प्रशांत जोशी यांनी तर आभार प्रदर्शन परळी शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष जगदीश शिंदे यांनी केले. या कार्यक्रमानंतर संघटनेच्या राज्य कार्यकारिणीची बैठक येथे झाली.

# माजी नगरसेवक सागर फडके यांनी दिला शैक्षणिक मदतीचा हात

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** शहरातील होतकरू व गरीब कुटुंबातील तब्बल साडेपाचशे विद्यार्थ्यांना माजी नगरसेवक सागर फडके यांनी शैक्षणिक मदतीचा मोलाचा हात दिला. प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वह्या देऊन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच त्याचे शैक्षणिक पालकत्व स्विकारले आहे. शहरातील सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या फडके यांच्या या सामाजिक दायित्वामुळे विद्यार्थी व पालकांची सोय झाली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा वाढदिवस उत्सवी स्वरूपात साजरा न करता त्यानिमित्ताने समाजोपयोगी सेवाकार्यात योगदान देण्याचे आवाहन भारतीय जनता पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आवाहन केले होते. त्यानुसार शेवगाव नगरपरिषदेचे माजी नगरसेवक सागर फडके यांनी शैक्षणिक वर्षाची सुरुवात लक्षात घेऊन शहरातील गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्याचे निर्णय घेतला. त्यानंतर अशा विद्यार्थ्याच्या नोंदणीसाठी शहरातील सर्व विद्यालयास आवाहन करण्यात आले.विद्यालयांकडून व पालकांनी केलेल्या संपर्कानुसार अशा साडेपाचशे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. आज रविवार दि.२३रोजी फडके यांच्या कार्यालयात उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अशा ५५० गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वहयांचे वाटप करण्यात आले.त्यासाठी प्रत्येकी दोनशे रुपयाप्रमाणे सर्व साडेपाचशे विद्यार्थ्यांचा तब्बल एक लाख रुपयांचा खर्च फडके यांनी स्वतः करत आपली समाजाप्रती असलेल्या जबाबदारीची जाणीव अधिक प्रखरपणे जोपासली .यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते बापुसाहेब भोसले हे होते.भाजपचे तालुकाध्यक्ष ताराचंद लोढे, सरचिटणीस भिमराज सागडे, माजी नगरसेवक महेश फलके, राहुल बंब व सागर फडके मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना तालुकाध्यक्ष लोढे म्हणाले की, सागर फडके यांनी कोरोना काळापासून गरजू कुटूंबास किराणा वाटप,महिला महोत्सव, रिक्षा चालकांसाठी मोफत विमा, स्त्री जन्म स्वागत म्हणून मुदत ठेव पावती, क्रिडा व नृत्य स्पर्धांचे आयोजन, रक्तदान, नेत्रदान व ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबीर उपक्रम असे सामाजिक उपक्रम राबविले आहेत. त्यामाध्यमातून नगरसेवक फडके यांनी आपल्या समाजोपयोगी कार्याचा वसा जोमाने पुढे सुरू ठेवला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश फलके यांनी तर कैलास सोनवणे यांनी सुत्रसंचालन केले. सागर फडके यांनी आभार मानले.



# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची कार्यकारिणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** २३ जुलै रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया- आंबेडकर चा धुळे जिल्हा कार्यकर्ता मेळावा राष्ट्रीय अध्यक्ष मा. दिपक भाऊ निकाळजे, प्रदेश कार्याध्यक्ष मा. बाळासाहेब पवार यांच्या आदेशानुसार व उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष शशिकांत दारोळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे जिल्हा अध्यक्ष दिनेश राज निकुंभ यांच्या नेतृत्वाखाली संदेश भुमी बस स्थानका जवळ धुळे येथे आयोजित करण्यात आला होता.

त्यानंतर धुळे जिल्हा अध्यक्ष यांच्या हस्ते धुळे जिल्हा उपाध्यक्ष पदि किरण आप्पा पवार , धुळे शहर अध्यक्ष पदि नितीन उर्फ पप्पूभाऊ पाटोळे , धुळे तालुका सचिव पदि किरण भगवान अहिरे , युवक शहर अध्यक्ष पदि स्वप्निल मोहिते, शहर सचिव पदि किशोर कुवर, शहर संघटक पदि नाना पवार, कार्यकारणी सदस्य विनोद वाघ यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या यावेळी धुळे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख महेश खैरनार, प्रदिप बागले, वाल्मिक अहिरे, महेंद्र वाघ, उत्तम उशिरे आदी उपस्थित होते.

यावेळी धुळे जिल्हा अध्यक्ष दिनेश राज निकुंभ यांनी कार्यकर्त्यांना पक्षाची भूमिका समजून सांगत येत्या काळात गावोगावी जाऊन तेथील होणारे अन्याय अत्याचार बाबत व नागरीकांच्या समस्या जाणून शासन दरबारी मांडून त्यांच्या वर होणाऱ्या अन्याया विरोधात आवाज उठवून त्यांना न्याय देण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया- आंबेडकर गट कटिबद्ध राहिल अशी ग्वाही दिली.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** घराबाहेर खेळत असलेल्या अल्पवयीन मुलीला ओळखीच्या आरोपीने घराच्या छतावर नेत तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. ही धक्कादायक घटना यशोधरानगर पोलीस ठाणे परिसरात उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्ह्याची नोंद करून त्याला अटक केली आहे. मनीष श्याम डहरीया (२५) रा. यशोधरानगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. २२ जुलै रोजी २४ वर्षीय फिर्यादींची अल्पवयीन मुलगी घराबाहेर खेळत होती.




महाराष्ट्र Business Katta













# आर बी मालपाणी: त्यागी व्यक्तिमत्त्व

आधुनिक केसरी

**घरात कुठलाही फोटो आपण लावतो त्यावेळी तो फोटो अथवा ती फ्रेमच तुम्हा आम्हाला दिसत असते,मात्र ती फ्रेम ज्या खिळ्यावर टिकून असते तो खिळा मात्र पडद्याआड असतो. प पू शुकदास महाराज यांनी बुलढाणा जिल्ह्यातील विवेकानंद नगर हिवरा आश्रम येथे उजाड माळरानावर विवेकानंद आश्रम स्थापन केला. त्यांच्यामुळे तिथे अनेक गावे वसली, विवेकानंद नगर ( हिवरा आश्रम ) हे गाव उभे राहले,विवेकानंद विद्या मंदिरामुळे राज्यभरातील मुले त्या शाळेतून शिकून बाहेर पडली. महाराजांनी दवाखाना उभा केला,केवळ चवथा वर्ग शिक्षण असलेल्या महाराजानी अनेकांना व्याधीमुक्त केले.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

मात्र हे सगळं करत असतांना आश्रम मजबुतपणे उभा करण्यामध्ये आर बी मालपाणी यांचे नाव अग्रस्थानी येते परंतु हा माणूस सतत खिळ्या सारखा पडद्याआड च राहला असे जर का म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

रतनलाल बालकीसन मालपाणी असे पूर्ण नाव असलेले मालपाणी सर हे मेहकर तालुक्यातील ब्रम्हपुरी या गावचे मूळ रहिवासी. मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेले मालपाणी सर यांना एकूण 2 बहिणी आणि 3 भाऊ असा हा परिवार.

ब्रह्मचर्य व्रत स्वीकारलेल्या मालपाणी सरांनी आपलं आयुष्य पू शुकदास महाराज संस्थापित विवेकानंद आश्रमासाठी खर्ची घातलं. पू शुकदास महाराज यांच्या नंतर आता सध्या मालपाणी सर हेच विवेकानंद आश्रमाचे अध्यक्ष आहेत.

प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झालेल्या मालपाणींनी त्यागी आयुष्य जगले. आपल्या हक्काच्या पगारातील पै ना पई विवेकानंद आश्रमाला दिली व आपले निवृत्ती वेतन, निवृत्तीनंतर मिळालेला आर्थिक लाभ देखील या माणसाने आश्रमाला दिला.



केवळ पैसा देणे एव्हढेच मर्यादित कार्य नाही. विवेकानंद आश्रमाचा आर्थिक कणा म्हणजे विवेकानंद आश्रमाचे वसतिगृह.राज्यातील कानाकोपऱ्यातून विद्यार्थी शिकायला येतात. निवास भोजन अशी निवासी व्यवस्था. विवेकानंद विद्या मंदिराची ख्याती मालपाणी सर यांच्या शिस्तीमुळेच राज्यभर जाऊन पोहचली. इथे विद्यार्थ्यांना संस्कार, अध्यात्माचे धडे देण्याचे काम मालपाणी सरांच्या नेतृत्वातील सर्व शिक्षकांनी केले.आश्रमासाठी त्याग करत असतांना मालपाणी सर यांची आई जोपर्यंत हयात होती, तोपर्यंत नाममात्र 200,300 रुपये तिला द्यायचे. आई आश्रमाच्या परिसरात कुडाच्या घरात रहायची. हिवरा आश्रम येथून जवळ असलेल्या श्री ओलांडेश्वर संस्थान येथे त्यांच्या सख्या भावाने नारळ, बेल, असे पूजा साहित्य विकून आपला संसार चालवला. आश्रम ताब्यात असतांना, आश्रमाला आपला संपूर्ण पगार दान देत असतांना त्यांनी आपल्या परिवारासाठी कधी आश्रमाचा फायदा घेतला नाही. उलट स्वतःच्या पैशातून आश्रमाची पावती फाडून महाराजांच्या पुतण्याला संस्थेवर घेतले मात्र स्वतःच्या परिवाराला कधी कशाचाच लाभ दिला नाही की,त्यांचे बस्तान बसून दिले नाही. संपूर्ण आयुष्य समर्पित भावनेने जपले.ना आपला भाऊ संस्थेवर नोकरीवर लावला,ना आपले पुतणे. आश्रमाची सर्वांगीण प्रगती आणि पू शुकदास महाराज यांचे ध्येय-स्वप्न पूर्ण करण्यासाठी, आश्रमाचा नावलौकिक राज्यभर वाढावा यासाठी आपले रक्त जाळले. आर. बी. मालपाणी सर जेव्हा बी एस्सी झाले त्यावेळी माझे वडील स्व रा ना पवार यांनी त्यांना सुल्तानपूर येथील श्री शिवाजी विद्यालयात शिक्षक म्हणून नोकरीला लावले.माझे बाबा त्याच संस्थेवर मुख्याध्यापक.

गावातीलच तरुण मुलगा पदवीधर झाला, सर्वसामान्य कुटुंबातील मालपाणी सरांना सर्वात अगोदर बाबांनी नोकरीला लावले. त्यावेळी त्यांचे वास्तव्य देखील आमच्याच निवासस्थानी होते. सुल्तानपूर नंतर त्यांची लव्हाळा येथे बदली झाली व त्यानंतर पू शुकदास महाराज यांनी शाळा सुरू केल्यानंतर ते शिक्षक म्हणून शुकदास महाराज संस्थापित विवेकानंद आश्रमाच्या विद्या मंदिरात रुजू झाले.

पू शुकदास महाराज यांच्यानंतर अध्यक्ष म्हणून आजरोजी ते काम पाहत आहेत.निस्वार्थ-त्यागी व्यक्तिमत्व असलेल्या मालपाणी सरांना राज्य शासनाने आदर्श शिक्षक या पुरस्काराने गौरविलेले आहे. 30 वर्षांपूर्वी विवेकानंद विद्या मंदिरात शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांना ते आज देखील नावानिशी ओळखतात व तो कुठल्या गावचा रहिवासी आहे हे बिनचूक सांगतात.त्यांच्या शिस्तीचे आज देखील स्मरण झाले की माजी विद्यार्थ्यांना आज ही घाम फुटतो.अनेक विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या त्यागी वृत्तीच्या मालपाणी सरांना पुढील भावी- आरोग्यदायी आयुष्यासाठी भरभरून शुभेच्छा


# वैचारिक नग्नता माणुसकीसाठी घातकच


विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**माणसाने माणसासोबत माणसा सारखे राहावे, विषमता व द्वेष नाहिसा व्हावा डोक्यातील अंधश्रद्धा, थोतांड, पाखंड बाहेर पडून मानसाचा तार्किक, बौद्धिक व वैज्ञानिक विकास व्हावा म्हणून संतानी भारतभर प्रबोधनाचे सिंचन केले. धर्म ग्रंथांनी महिलांना माणसिक व शारिरीक गुलाम बनवून महिलांचे शारीरिक व सामाजिक शोषण केले जायचे. महिलांना केवळ चुल आणि मुल एवढ्याच बाबींवर मर्यादित करून तिला चौकटही ओलांडू दिली जात नसे. मुळात महीलांवर सामाजिक व शारीरिक बंधने लादुन चार भिंतीच्या कोपऱ्यात महिलांना स्थान देणाऱ्या लोकांना माणुस व मर्द म्हणावेच कसे हा प्रश्न पडतो. हजारो वर्षांपासून महिला या अंधश्रद्धा, पाखंड, थोतांड धार्मिक अनिष्ट रुढी परंपरा मुळे माणसिक गुलाम झाल्याने माणसाची सेवा करणे हाच तिचा धर्म होऊन बसला होता. जी महिला घरातील व्यक्तीची चांगली सेवा करून घरातील एका कोपऱ्यात राहणे पसंत करेल.**

पती कितीही व्यभिचारी व बेवडा असला तरीही ती त्याच्या सोबत चांगलीच राहील अशी शिकवण देणारे ग्रंथ आणि त्याचे पालन करणारे लोक मर्द तर नाहीत परंतु भ्याड व नितीहीन होते व आहेत असेच म्हणावे लागेल. माणसाला जातीजातीमध्ये वाटून एकमेकांना तुच्छ व हिन समजणारे विषमतेची घाण डोक्यात असलेल्या लोकांना माणुस म्हणणे देखील चुकिचे आहे. माणसा सारखे माणूस असुन, सार्वजनिक ठिकाणी जाणे, पाणी पिणे, माणसाने माणसासोबत बसने हे देखील जेथे पाप समजले जायचे ते विचार ते संस्कार साफ कसे असतील ? आणि असे विचार करणाऱ्या लोकांना माणुस म्हणायचे का ? जेथे माणसाचा माणसाला स्पर्श जमत नव्हता, जेथे माणसाला पाणी पिता येत नव्हते अशा ठिकाणी आदर्श धर्माच्या व मानुसकी च्या व संस्कारच्या गप्पा करणे म्हणजे व्यभिचारी मानसाला संन्यासी म्हणणे होय. परंतु ही व्यवस्था मोडीतच काढली नाही तर दुसरी समता बंधुता व न्याय यावर आधारित व्यवस्था निर्माण करून महिला व माणसांना सन्मानाचे, समतीचे व संधीचे स्थान देऊन हजारो वर्षाची गुलामगिरी, विषमता व अंधविश्वास व पाखंडावर आधारित संस्कृती मोडून काढणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने महामानव ठरतात. धर्मांध, धर्ममार्तंड, आणि धर्माचे ठेकेदार यांनी प्रंचड विरोध करूनही महिलांना न प्रत्येक भारतीयांना माणसिक गुलामगिरी मधुन मुक्त करून माणुस बनवले त्याचे संरक्षण व्हावे अशी तरतूद करून हजारो वर्षाच्या व्यवस्थेला सुरुंग लागला. जात, धर्म, पंथ, लिंग या आधारावर भेदभाव करता येणार म्हणून अनेकांची जळफळाट झाली. संविधानामुळे घरातील महिला चौकटीच्या बाहेर पडून शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नती करून माणसा प्रमाणे जिवन जगु लागल्या. वेगवेगळ्या पदावर विराजमान झाल्या. हजारे वर्षांपासून जी शिकवण होती महिलांनी पुरुषांची व धार्मिक ग्रंथाची गुलाम बनवू रहायचे त्या महिला अधिकारी होतात, चांगले जिवन जगतात ही बाब विषमतावादी लोकांना खुपायला लागल्याने सुरवाती पासुन समता बंधुता मान्य नसणाऱ्या लोकांनी आणि संविधान बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून विरोध करायला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सुरवात केली. संविधान बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून किती तरी लोकांनी अजूनही संविधानाला स्पर्शही केला नाही यातुन यांची बौद्धिक पातळी लक्षात येते. आणि अशाच विषमतावादी बौद्धिक पातळी असलेल्या लोकांमुळे आजही अनेक समस्या निर्माण होत आहे. म्हणजे ज्यांना काहीच हक्क अधिकार नव्हते जे गुलाम होते



ते बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे भौतिक स्वातंत्र्य झाले परंतु माणसिकता अजूनही सडलेली कुजलेली आहे. याचे अनेक उदाहरणे आहेत. सर्वांना माहीती सुद्धां आहेत. आणि प्रत्येक घटना हि विषमता वादी लोक कसा विचार करतात, यांची बौद्धिक पातळी आजही जातीमध्ये बंद कशी आहे हे दिसून येते. आणि यालाच वैचारिक अथवा बौद्धिक नग्नता म्हणता येईल. आणि अशा विचार धारेला सत्तेत असलेले लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कसे समर्थन करतात हे दिसुन येते. खैरलांजी वर गप्प बसणारे लोक दिल्ली निर्भयावर आंदोलन करतात, खैरलांजी मध्ये भोतमांगे कुटूबांचे खरे नाव सर्वा समोर आणले जाते, दिल्ली ला निर्भया बोलले जाते, अफताब विरुद्ध भारत पेटवला जातो, साने विरोधात शब्दही बोलत नाहीत, औरंगजेब च्या फोटोने शातंता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो म्हणून दंगल घडवून आणली जाते, परंतु देशाची माहिती पाकिस्तान ला देणाऱ्या कुरुलकरावर देशद्रोहाचा खटला दाखल होत नाही. दिपीका पादुकोण हिंदू, चित्रपट बनवणारे हिंदु, बिकणी घालणारी हिंदु आणि मुस्लिमांना दोष दिला जातो तेव्हा लोकांची व जबाबदार व्यक्तीची माणसिकता काय होती हे लक्षात येते. गाईला मारले तर धर्म धोक्यात येतो, धर्माचा अवमान होतो परंतु रोजच महिलांवर बलात्कार होतात सर्व गप्प, मागासवर्गीय लोकांवरचे अन्याय अत्याचार थांबायचे नाव घेईना, परंतु गाय, बिकनी यावर बोलणारे लोकांच्या हत्या होतात तरी बोलत नाही. उर्फी जावेद तोडके कपडे घालते म्हणून संस्कृती धोक्यात येते मुलींवर विपरीत परिणाम होतो म्हणून डंगा पिटणारे लोक मनिपुर मध्ये महिलांवर बलात्कार करून नग्न धिंड काढली जाते तेव्हा गप्पा बसतात हे बघून आजही जातीयता किती घट्ट मनात बसलेली आहे हे दिसून येते. यालाच वैचारिक नग्नता म्हणतात. कपड्यावरुन संस्कृती धोक्यात येते परंतु महिलांचे जबरदस्तीने कपडे काढून धिंड काढली तर संस्कृती धोक्यात येत नसेल का ? महिला म्हणून यावर महिलांची काय प्रतिक्रिया असायला पाहिजे ? सोशल मिडीयावर तर मनिपुर प्रकरणात महिलांच्या उच्च जातीतील प्रतिक्रिया बघुन महिला ह्या महिलेच्या अब्रचा हाशा करू शकतात हे कल्पना शक्तीच्या बाहेरचे आहे. काही काही महिला सोशल मिडीयावर पिढीत महिलांच्या चारीत्र्यावर संशय घेऊन कपडे काढून धिंड काढली तर एवढे प्रकरण मोठे कशाला करायचे ? तसेही कपडे काढणे हे संस्कृती च आहे असे व्यक्त होताना महिलांच्या बुद्धीचीही किव येते. म्हणजे पिढीत महिलेवर विनोद निर्माण करने ही संस्कृती आहे तरी कोणाची ? पिढीतेविषयी सोशल मिडीयावर अनेक महिला चुकीचे बोलत आहेत परंतु धर्माचे रक्षक, गोरक्षण किंवा सत्ताधारी लोकांशी संबधीत कोणीच त्या महिलांना तुमचे मत चुकीचे आहे. महिलांना महिलांविषयी अस बोलु नाही असे बोलताना दिसत नाही. याला सर्वात महत्वाचे कारण आहे जात. कारण विनोद करणाऱ्या उच्च जातीतील आहेत आहे पिढीत खालच्या जातीतील आहेत. आता या ठिकाणी दोन गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत मनिपुर च्या पिढीता ह्या उच्च वर्णीय अथवा गायी असत्या तर देश एवढा शांत असता का ? आणि दुसरी मध्ये मनिपुर घटने मध्ये ज्या उच्च वर्णिय महिला सोशल मिडीयावर व्यक्त होत आहेत. त्या जागी मुस्लिम महिला असत्या तर देशात शांतता असती का ? जाती धर्माच्या नावाखाली गाईला माय माणायचे आणि स्त्रियाच्या अब्रू ची धिंड काढल्यावर पिढीतेवर विनोद करून तिला दोष द्यायचा हिच नग्न माणसिकता आहे. शारीरिक नग्नता फाटक्या कपड्यानेही झाकता येईल परंतु वैचारिक नग्नतेचे काय ? एकिकडे हिंदु राष्ट्राची पोकळ वल्गना करताना दुसरीकडे पिडीतेला आदीवासी म्हणून ओळख दिली जाते आहे आदीवासी आहे म्हणून आरोपीविरुद्ध आंदोलन तिव्र होऊ शकत नाही, त्यावर चर्चा होऊ शकत नाही. देशाची मान जगात झुकलेली असताना भारतीय उच्च वर्णीय महिला मनोरंजन म्हणून आदिवासी महिलांचा बलात्कार इंजॉय करत असतील तर या विचारधारेला नेमक काय म्हणावं ? आदीवासी व्यक्तीच्या तोंडावर मुतले जाते, आदिवासी महिलांवर बलात्कार होतो, कुठे कानात मुतले जाते, मध्य प्रदेश मध्ये मागासवर्गीय तरुणाला मानवी विष्ठा चारण्याचा किळसवाणा प्रकार येथे घडतो. आणि हिंदुराष्ट्र, विश्वगुरु, निरपेक्ष व पारदर्शक सरकारच्या गोष्टी करणारे लोक यावर गप्प आहेत याचा अर्थ जे गप्प आहेत त्यांचे विचार किती किळसवाणे असतेतील याची कल्पना येते. टोळक्याने येऊन महिलेवर बलात्कार करून धिंड काढणे हा मर्दपणा नाही तर कठीण प्रसंगी गळ्यातील रुमालाने महिलांची अब्रु झाकणे मर्दाचे काम आहे. टोळीने येऊन मागासवर्गीय तरुणांना मारहाण करणे, घाण पाणी पाजणे, विष्ठा खाऊ घालण्याचा प्रयत्न करणे हे किळसवाणे प्रकार करणारे मर्द नाहीत तर याविरोधात जिवाची बाजी लाऊन आवाज उठवणारा खरा मर्द असतो. सर्व समान आहेत, एकाच देवाची लेकरं आहोत असे वायफाय बोलणारे व बिकनीच्या रंगावर, आफताब नावावर देशभर गोंधळ घालणारे लोक जेव्हा आदींवासीच्या तोंडावर मुतले जाते, बलात्कार होतो, घाण पाणी पाजले जाते, गावातून चांगले कपडे घालून जाताना मारले जाते, सोबत बसला म्हणून मारले जाते अशा वेळी गप्प बसतात तेव्हा त्यांचे विषमतावादी विचार समोर येतात. आणि हिच विचाराची नग्नता देशात विषतमता द्वेष पसरवून जातीतील व सत्तेतील आरोपींना पाठीशी घालुन आजही विषमता, गुलामगिरी व लाचारी जिवंत असल्याचे पुरावे देतात. असे असताना ही ज्यांना धर्माचा गर्व असेल, माणुसकीला काळीमा फासला गेला तरीही संस्कार व संस्कृती च्या गोष्टी कोणी करत असेल तर तो त्याचा धंदा आहे. जातीधर्माच्या नावाखाली आरोपींना जगवले जाते. हेच खुप घातक आहे. राजकीय नेत्यांना व धर्माच्या ठेकेदारांना जेव्हा फायदा करून घ्यायचा असतो तेव्हा सर्वजन हिंदु असतात. जेव्हा अन्याय अत्याचार होतो आणि न्यायाची वेळ होते तेव्हा मात्र कोणी आदिवासी, कोणी मागासवर्गीय, कोणी मुस्लिम असतो. अशा नग्न माणसिकते मुळेच देशात बलात्कार, लैंगिक शोषण व मागासवर्गीय आदिवासी समुदायामध्ये हत्येचे प्रमाण वाढले आहे. याला जबाबदार राजकारणामध्ये आणलेला धर्म आणि डोक्यात असलेली विषमता. धर्माच्या किंवा जातीय शक्तीच्या जोरावर इतरांवर अन्याय अत्याचार करणाऱ्यांना भ्याड म्हणतात.

# आधुनिक केसरी : समाजमनाचा आरसा

आधुनिक केसरी

आधुनिक केसरीचा द्वितीय वर्धापन दिन साजरा करत असतानां मला अतिशय आनंद होत आहे. अल्पावधितच सर्वांची मने जिंकून, मनावर अधिराज्य गाजवीणारा आपला आधुनिक केसरी सर्वांच्या मनी



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

उतरला ही आपणां सर्वांसाठी अतिशय सुखद घटना आहे. वर्तमानात सोशलमिडीया-इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या युगात प्रिंट मिडियातील एखाद्या दैनिक वृत्तपत्राने एवढे मोठी उंच भरारी घेवून समाजाच्या सर्वांगाला स्पर्श करून मोठे शिखर गाठणे म्हणावे तेवढे सोपे नाही. लोकाग्राहाखातर एवढा मोठा गोवर्धन उचलणे ही सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आयुष्याच्या वाटेवर प्रत्येकजण पळ... पळ... पळत असतो. पण मुक्काम गाठण्याचे ध्येय क्वचितच करतात. त्यापैकी एक म्हणजे आपला आधुनिक केसरी. साधी सुधी गोष्ट करावयाची झाली तर आपली तारांबाळ होत असते. पण ज्याच्यामनी ध्येयपूर्वीचा ध्यास असतो तेच जनमनात आपले स्थान टिकवीत असतात. व्यक्तिपरत्वे समाजकारण, राजकारण करून अल्पावधीतच आपण जनतेच्या व सामान्य वाचकांच्या मनी उतरलात हिच खरी आपल्या यशस्वी वाटचालीची सुरूवात आहे. प्रवाहात कित्येक येतात आणि जातात पण जे आपल्या कर्तृत्वाने आपले स्थान अढळ करून ठेवतात तेच वादळातही खंबीरपणे उभे राहतात. आपणच आपले कौतुक करण्यास खरोखरी शब्द सामर्थ्यही कमी पडते. पत्रकारीतेच्या क्षेत्रात विशेषतः प्रिंट मिडियामध्ये जिल्हा स्तरावरच नव्हे तर राज्य, देश व जागतीक स्तरावर आपण आपल्या लेखणीच्या माध्यमातून राजकारण, समाजकारण, प्रशासन, धर्म व जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करून वास्तव समोर ठेवता म्हणूनच आधुनिक केसरीचा प्रत्येक अंक सर्वांना वाचावासा वाटतो. विशेशत्वाने आपले सर्व कुटुंब (आधुनिक केसरी) अतिशय सुक्ष्मतेने प्रत्येक बाबीचे निरीक्षण करून त्याची जी रंगतदार सजावट करता ती वाचकाला वाचनाची ओढ निर्माण करते. हे सर्व करत असताना अन्यायाला वाचा फोडून जन सामान्याच्या व्यथेला समोर ठेवण्याचे काम आधूनक केसरीच्या माध्यामातून होत असते. वर्तमानात सर्वत्र सर्वच मिडिया उद्योपती तथा राजकीय पुढाज्यांच्या मालकीची असल्यामूळे विसंगत न्यायाची परिस्थिती निर्माण होते पण आपल्याकडून असे न घडता सर्वांसाठी समान न्याय याच मुळतत्त्वावर सामाजिक बांधीलकीचे भान ठेवून आपल्या मार्फत लोककल्याणाचे कार्य घडत असते ही सर्वांसाठी अभिमनासह कौतुकाची बाब आहे. कांही तरी, कसे बसे करून आपले कार्य आटोपणे हा आपला स्थायीभाव नसल्यामूळे सर्वच स्तरावरील सर्वांची नाळ आधुनिक केसरीशी जुळलेली आहे. एखादे साप्ताहिक अथवा चार पानाचे दैनिक काढून, दारोदार फिरून आपले खिसे भरण्याचे काम आपल्याकडून कधीच होत नाही. उलट स्वाभिमान, संवदना, विचाराची बांधीलकी व तत्त्वानिष्ठा सांभाळून आपली कार्यवाट चालू आहे. खऱ्याला खरे म्हण्याची धमक आपल्या लेखणीत असल्यामूळे सर्वच स्तरावर आपण आपले आधिष्ठान पक्के केले आहे. अशी लेखणी आज अपवादानेच आढळते. थोडक्यात बहुआयामी म्हणूनच आपण सर्व परिचीत आहात म्हणूनच आपणास समाज मनाचा आरसा म्हणणे वावगे नसावे. आधुनिक केसरीचा प्रत्येक अंक सर्वांगाने वाचनिय आहेच, शिवाय ही वैचारीक मेजवाणी असून जन सामान्यांच्या प्रश्नाला वाचा फोडणारी एक लोकचळही आहे.





आपण अल्पावधीतच यशाची उत्तुंग भरारी घेतल्याबद्दल आपल्या सर्वांच्याच लाडक्या आधुनिक केसरीच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्ताने मा. संपादक, उपसंपादक तथा आधुनिक केसरीच्या सर्वच टिमचे मनापासून अभिनंदन उत्तरोत्तर अशीच प्रगती होऊन अन्याया विरोधात लढण्यासाठी जनतेचा आवाज बुलंद व्हावा हीच सदीच्छा व भावी वाटचालीस सहृदय खूप खूप शुभेच्छा. या प्रसांगावरून हिंदीतील चार प्रेरणादायी ओळी आपणां सर्वांसमोर ठेऊन माझ्या विचारांना पूर्णवीराम देतो.

**हौसलोंके आगे कोई परदा नही होता ।**
**कडे परिश्रमोंका कोई विकल्प नही होता ।**
**दिल मे हो जज्बा कुछ कर दिखानेका तो,**
**जलते दियों को भि आँधीयोंका डर नही होता ।**
**जय हिन्द ।इन्कलाब जिंदाबाद ।लाल सलामो**

# मणिपूर हिंसाचार रोखण्यात सरकार अपयशी

आधुनिक केसरी

गेल्या दोन अडीच महिन्यांपासून जातीय हिंसाचाराच्या आगीत होरपळत असलेल्या मणिपूरमधून एक भयानक व्हिडिओ समोर आला आहे. त्यामध्ये पुरुषांचा एक गट दोन महिलांना विवस्त्र करून रस्त्यात



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करताना दिसत आहे. या घटनेचा व्हिडिओ समोर आल्यानंतर डोंगरी राज्यात तणावाचे वातावरण आहे. दोन्ही महिलांना शेतात नेऊन सामूहिक बलात्कार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी विरोधी पक्षांनी या निंदनीय घटनेचा निषेध करत चिंता व्यक्त केली आहे. मणिपूरमध्ये जवळपास दोन अडीच महिनाभरापासून हिंसाचार सुरू आहे. हायप्रोफाईल नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या प्रयत्नानंतरही येथे हिंसाचार का थांबत नाही? आणि मणिपूर पुन्हा जुन्या "संघर्षात" जात आहे का? यामागचे कारण काय आहे, या प्रश्नांची उत्तरे फार खोलवर जावून शोधण्याची गरज आहे. सरकार यात कमी पडत. मणिपूरमध्ये जो जातीय तणाव निर्माण झाला आहे.या जातीय तनावांला केंद्र व राज्य सरकारने फारसे गांभीर्याने घेतले नाही. देशातील कोणत्याही भागात जातीय,सांप्रदायिक तणाव निर्माण होणार नाही यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी सावध व सतर्क असायला पाहिजे. मात्र अशा हिंसक घटना थांबविण्यात सरकार सपशेल अपयशी ठरत आहे.निवडणुका व.विदेश दौऱ्याना सरकार जितकं महत्त्व देत असते त्या पेक्षा जास्त महत्त्व देशांतर्गत संवेदनशील मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करायला पाहिजे. मात्र सरकार कुठ तरी कमजोर पडत असून सरकारचे दुर्लक्ष होत आहे. गेल्या दोन अडीच महिन्यापासून मणिपूरमध्ये हिंसाचार सुरू आहे. गेल्या महिन्यात ३ मे रोजी म्हणजे आजपासून ठीक अडीच महिने आधी, ऑल ट्रायबल स्टुडंट्स युनियन (ATSUN) ने काढलेल्या "आदिवासी एकता रॅली" नंतर हा हिंसाचार पसरला होता. आतापर्यंत, सरकारी आकडेवारीनुसार, हिंसाचारामुळे १०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर हजारो लोक जखमी झाले आहेत. याशिवाय आगीत हजारो घरे जळून खाक झाली आहेत. देशाचे गृहमंत्री, गृह राज्यमंत्री, सीडीएस आणि सर्व हाय प्रोफाईल लोकांच्या उपस्थितीनंतरही सरकारला हिंसाचार थांबवता आलेला नाही. राज्यात एवढे मोठे नेते आणि प्रशासकीय अधिकारी येऊनही हिंसाचार थांबत नाही, तेव्हा सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. हिंसाचार थांबवण्यासाठी सरकार खरोखरच गंभीर आहे का? आणि जर गंभीर असेल तर ती त्याला का थांबवू शकत नाही? हिंसाचार सुरू होऊन दोन महिने उलटूनही त्यावर नियंत्रण मिळवता आलेले दिसत नाही आणि मणिपूरमध्ये हिंसाचाराची पातळी मोठी आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे पद्धतशीरपणे जाणून घेण्याची गरज आहे. याआधी ईशान्य भारतात, विशेषतः मणिपूरमधील कोणत्याही हिंसाचारात आधुनिक शस्त्रांच्या या पातळीचा वापर केला जात नव्हता, त्यामुळे यावेळची हिंसा खूपच वेगळी आणि धोकादायक दिसते. यावेळी हिंसाचारात शस्त्रे, दारूगोळा आणि मोठ्या बंदुकांचा समावेश आहे आणि एक मोठा गेम प्लॅन देखील आहे, त्यामुळे ते भीतीदायक आहे.

अशाही बातम्या येत आहेत की सीमेपलीकडून लोक शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा घेऊन मणिपूरमध्ये येत आहेत, हे आणखीनच भितीदायक आहे आणि जर सरकारने यावर नियंत्रण ठेवले नाही, तर येणाऱ्या काळात ते विनाश घडवेल. राज्य आणि केंद्र सरकारच्या विधानातील विरोधाभास पाहता हिंसाचाराची पूर्ण जाणीव नसल्याचे दिसते. राज्य आणि केंद्र सरकारच्या विधानातील विरोधाभास पाहता, दोन्ही सरकारांना एकतर या भीषण पातळीच्या हिंसाचाराची पूर्ण जाणीव नाही किंवा या हिंसाचाराचा धोका गांभीर्याने घेत नसल्याचे दिसते. राज्याचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग आणि देशाचे गृहमंत्री अमित शाह हिंसाचाराच्या संदर्भात वेगवेगळ्या व्यासपीठांवर उभे राहिलेले दिसतात.

एन. बिरेन सिंग यांनी अलीकडच्या काळात चालू असलेल्या हिंसाचाराला "कुकी अतिरेकी" आणि सुरक्षा दलांमधील लढा असे म्हटले आहे, "जातीय संघर्ष" नाही. ते म्हणाले की, राज्यातील हिंसाचारामागे 'कुकी समुदाय' स्पष्टपणे आहे. त्याच वेळी, त्यांनी असेही म्हटले होते की प्रशासनाने "प्रतिशोधात्मक कारवाई" मध्ये ज्या ४० अतिरेक्यांना ठार केले ते सर्व ४० कुकी "दहशतवादी" होते ज्यांनी राज्यात हिंसाचार पसरवला.

दुसरीकडे, सीडीएस लेफ्टनंट जनरल अनिल चौहान यांनी अलीकडेच पत्रकारांना सांगितले की मणिपूरमधील "सध्याची अशांतता" ही प्रामुख्याने "जातीय संघर्ष" आहे आणि कोणत्याही प्रकारची "बंडखोरी" नाही. गृहमंत्री अमित शहा यांनीही सीडीएसच्या विधानांचा पुनरुच्चार केला आणि मणिपूरच्या चार दिवसांच्या त्यांच्या दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी पत्रकार परिषदेत सांगितले की अलीकडील हिंसाचार हा "जातीय संघर्ष" होता. तेथे असताना त्यांनी एन. ४०.कुकी "दहशतवादी" "प्रत्युत्तराच्या कारवाईत" मारले गेल्याचे बिरेन सिंग यांचे विधानही फेटाळण्यात आले. गृहमंत्री आणि सीडीएसचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांचे विधान पूर्णपणे विरुद्ध आहे. एवढ्या गंभीर विषयावरही राज्य सरकार आणि केंद्र सरकार एकाच पानावर का नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावरून हे स्पष्ट होते की, केंद्र आणि राज्य सरकारने या हिंसाचाराचे गांभीर्य लक्षात घेऊन गांभीर्याने पाहिले नाही, त्यामुळे हिंसाचार या पातळीवर पसरला. मणिपूरमध्ये हिंसाचार सुरू होऊन दोन महिने झाले आहे. या हिंसाचारामुळे राज्यातील जनता सर्व बाजूंनी त्रस्त आहे. हिंसाचाराची पातळी कमी होण्याऐवजी वाढत असल्याचे दिसते. मात्र, गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्यानंतर हिंसाचारात सुधारणा अपेक्षित आहे.

सरकार हिंसाचार रोखू शकत नसल्याच्या प्रश्नावर जनता प्रश्न उपस्थित करत आहे.राज्यात एवढी कडेकोट सुरक्षा असतानाही, हिंसाचारावर नियंत्रण मिळवण्यासाठी इतका वेळ लागला आहे, ज्यामुळे देशाच्या सुरक्षा व्यवस्थेवरच प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या गृहमंत्र्यांपासून ते देशाच्या गृहराज्यमंत्र्यांपर्यंत सीडीएसची उपस्थिती आणि त्यांच्या दौऱ्यांनंतरही, राज्यात हिंसाचार थांबत नसताना, या लोकांवरील हिंसाचार थांबवण्यासाठी गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ईशान्य भारताच्या राजकारणाशी संबंधित तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की मणिपूरमध्ये सुरू असलेला हिंसाचार राज्याला 'अतिरेकी'च्या जुन्या युगात घेऊन जाऊ शकतो. खरे तर, ईशान्येकडील जवळपास सर्वच राज्ये गेल्या अनेक दशकांपासून भीषण बंडखोरीचा सामना करत आहेत. मणिपूरमध्येही अनेक दशकांत मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली आहे.

अलीकडच्या दशकांतील बंडखोरीचा इतिहास पाहता, १९९० च्या दशकातील नागा बंडाची आठवण येते. १९९० च्या दशकात, नागा राष्ट्रीय चळवळ मोठ्या प्रमाणावर "ग्रेटर नागालिम" नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड, आयएमची मागणी करत होती. इथे लक्षात घेण्याजोगा मुद्दा हा आहे की आज मेईतेई आणि कुकी या दोन समुदायांमध्ये जो हिंसाचार सुरू आहे, त्या वेळी हे दोन्ही समुदाय एकमेकांच्या पाठीशी उभे होते.

# श्रीब्रह्मविद्या पाठशाळा, महानुभाव आश्रमाचे कार्य

आधुनिक केसरी

गेली अनेक वर्षांपासून तरडगाव ता.फलटण येथील श्रीब्रह्मविद्या पाठशाळा, महानुभाव आश्रमचे संचालक आचार्य महंत श्रीराहेरकरबाबा महानुभाव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.अध्यात्मिक क्षेत्रासह सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक माध्यमातून अनेक विद्यार्थी साधक घडविण्याचे कार्य केले जाते. विविध उपक्रम व शिबिरे हाती घेतली जात असतात.तरडगाव येथे महानुभाव आश्रम-ब्रह्मविद्या पाठशाळा या संस्थे द्वारा गेली ३० वर्षे हे कार्य सुरू असून महाराष्ट्रातील विविध भागातून २०० साधक ब्रह्मविद्या अध्ययन आत्मसात करीत आहेत.सर्वसमावेशक विविध उपक्रम ,युवा व बालसंस्कार शिबीर,नित्यविधी प्रशिक्षण शिबीर व योगसाधना तसेच वैद्यकीय शिबीरांचे आयोजन केले जात असते.महानुभाव आश्रम समवेत संलग्न असलेल्या "सर्वज्ञ प्रतिष्ठान पदयात्रा" या संस्थेद्वारे महंत श्रीराहेरकरबाबा यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर पायी परिभ्रमण केले असून समाजप्रबोधन व व्यसनमुक्तीचे महत्वपूर्ण कार्य करीत आहेत.आश्रमात अनेक विद्यार्थी,साधक घडत आहेत. पुणे विद्यापीठात अनेक चर्चासत्रामध्ये व परिसंवादात महंत श्रीराहेरकरबाबाजी यांनी सहभाग घेऊन आश्रमच्या कार्यासोबतच जीवन प्रणालीचे उत्तम प्रकारे मार्गदर्शन करीत आहेत.महानुभाव आश्रम संस्थेद्वारे मुंबई शहरात २३ वर्षापासून अखंड प्रबोधनसेवा चालू आहे.आश्रमातील साधकांना श्रीभद्भगवद्गीता व ब्रह्मविद्या शास्त्राचे मार्गदर्शन दररोज चालू असते.संस्थेच्या माध्यमातून अनेक मठ,मंदिराचे सुयोग्य संचलन केले जाते.आश्रमस्थ विद्यार्थ्यांना मोफत शालेय व पंथिय शिक्षण दिले जाते.सर्वोत्तम आदर्श अनुयायी घडविण्यासाठी सातत्यपूर्ण प्रबोधन,प्रशिक्षण, संत्सग धार्मिक शिबिरे आदी विषयांना स्पर्श केला जातो. महाराष्ट्रासह उत्तर भारत तथा दक्षिण भारत तसेच जम्मू दिल्ली शहरात हिंदी व मराठी भाषेमध्ये श्रीभद्भगवद्गीता व ब्रह्मविद्या शास्त्राचे मार्गदर्शन चालू आहे श.तसेच श्री ब्रह्मविद्या संशोधन व संपादन संस्था द्वारे दर्जेदार अभ्यासपूर्ण पंथ उपयोगी ग्रंथाची निर्मिती केली जाते.श्रीब्रह्मविद्या सार्वजनिक वाचनालयाद्वारे पंथीय व सामाजिक ग्रंथपुस्तिके वाचण्यासाठी उपलब्ध करण्यात आलेली आहे.श्रीब्रह्मविद्या चिकित्सालय माध्यमातून आश्रमातील साधकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली जाते.२१ व्या शतकात गतिमान होत असणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे महानुभाव पंथ धर्मप्रसार युटूब चैनल या माध्यमातून अध्यात्मिक उपक्रम आयोजित करण्यात येतात.महानुभाव आश्रम संस्थेची स्थापना १९९३ मध्ये त्यागमूर्ती महंत श्रीजुन्नरकरबाबाजी यांनी केली.संस्थेच्या संवर्धनासाठी गुरुमाऊली कै.कमलबाई कपाटे व मार्गमाऊली कै.इंदूबाई कपाटे यांनी यांनी अत्यंत कष्ट,मेहनत घेऊन संस्थेच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे.



संकलन व लेखन : पू.श्री. प्रमोदराज राहेरकर, तरडगाव




# तिच्या जिद्दीने उभं राहिलं ब्रिलीयंट इंग्लिश स्कूलचं संकुल

आधुनिक केसरी

शिक्षणासारखं पवित्र संकुल हे जगात कोणतेच असू शकत नाही.विद्यार्थी घडविण्यासाठी ज्या शैक्षणिक संकुलातून गुरुजनांच्या मदतीने नुसते विद्यार्थीच नव्हे तर एक संस्कारक्षम पिढी तयार करन्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार पडत असते.हेच कार्य  पार पडण्याची संधी आम्हांला मिळाली ती फक्त आणि फक्त



जयकुमार खरात
संपर्क क्र.: ८४५९५५७३५४


तिच्या जिद्दीमुळे.. तिच्या बद्दल सांगितल्या शिवाय हे उभं राहिलेलं ब्रिलीयंट इंग्लिश स्कूलचं एक शैक्षणिक संकुल पूर्ण होऊच शकत नाही.  एक मुलगी फक्त चार महिन्याची असताना तिच्या आईचा अकस्मात मृत्यू होतो,वडिल तिला आजोळी सोडून नवा संसार थाटतात.अशा परिस्थितीत सात आठ वर्षांपर्यंत आजोबा आजी तिचा सांभाळ करतात.
मावशीला कायम
बिलगलेली ती पोरपुरती निराश होते.ते मावशीच्या लग्नानंतर मावशीचे सासरी जाण्याच्या कल्पनेनेच. तिला आधार तुटल्याची जाणीव होते आणि तापाने फणफणते. तिला काका दवाखान्यात घेऊन जावे. या उद्देशाने सोबत घेऊन जातो. वयाने लहान असुनही परिस्थितीने तिची विचारशक्ती पोक्त असते.काका मावशीच्या घरी हळूहळू रुळते.पोटच्या पोरीसारखी ती त्यांना वाटू लागते.शिक्षण चालू असताना तिच्या डोळ्यापुढे येतात ती अनेक स्वप्ने.शिक्षण घेत असतानाच काही तरी करून दाखवावे ही उमेद उराशी बाळगून दोन वर्षे चुलत्यांकडे मुंबईला जाऊन नर्सरी कोर्स पूर्ण करून पुन्हा काका मावशीच्या घरी येऊन एका शाळेत नोकरी करते.पण मन लागत नाही,मन कुठेतरी धाव घेत असतं, आणि काकांच्या घरी शिकवणी सुरु करते.चार मुलांवर शिकवणी करता करता मुले वाढत वाढत घर अपुरे पडते आणि आज त्यातूनच एक शैक्षणिक संकुल उभे राहते.त्यात आजमितीला सहाशेहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.तेच ते खंडाळा बावडा येथे उभे असलेले खंडाळा बावडा येथील आदर्श शिक्षण संस्थेचे ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज आज दिमाखात पहिली दहावीची बॅच शिक्षण घेत आहे.ही काही कुठल्या लेखकाने लिहिलेल्या कथेची मांडणी नाही तर खंडाळ्याच्या माळावर फुलत असणारे कु.सुदर्शना धनंजय जाधव या जिद्दी मुलीने उभारलेली ज्ञानसृष्टी आहे.तिचे काका म्हणून मी जयकुमार खरात आणि तिची मावशी म्हणून माझी पत्नी स्नेहल खरात आम्हा दोघांना हे शैक्षणिक संकुल तिच्या जिद्दीमुळे पाहता येत आहे.ब्रिलीयंट इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून गेली दहा वर्षांपासून आज शैक्षणिक क्षेत्रात एक चांगले कार्य करता येत आहे.तिने मारलेली भरारी, तिच्या जिद्दीला कायम साथ देण्याचं काम मी आणि माझी पत्नी करत असतो.तिची जिद्द शाळेची मुख्याध्यापिका म्हणून शाळेचा पूर्ण कारभार सांभाळत आहे.ज्या शिक्षणाचं कोणतेही मोल असू शकत नाही ते अनमोल असते.अशा अनमोल सेवेचे शिक्षण विद्यार्थ्यांना देणारं एक संकुल तिच्या जिद्दीतून उभं राहिलं.याचा सार्थ अभिमान वाटत आहे. पालकांचे मोलाचे सहकार्य लाभत असून शाळेतील गुरुजन वर्ग विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी विशेष मेहनत घेत असतात.

शाळेत शैक्षणिक कार्यासोबतच विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी कळावी. याच दृष्टीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असतात.झाडे लावा झाडे जगवाचा संदेश ही दिला जात असतो.परिपूर्ण शिक्षण देणारी शिक्षण प्रणाली तिच्या जिद्दीने उभं राहिलेल्या ब्रिलीयंट इंग्लिश स्कूलच्या संकुलात पार पडत असते.याचे समाधान वाटत आहे.


















# सातशे किलो गोवंश जनावरांचे मांस जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** मालवाहू वाहनातून ७०० किलो गोवंश जनावराचे मांस वाहून नेण्यात येत असताना ओझर पोलिसांनी वाहन अडवून चालकावर गुन्हा दाखल करून अटक केली आहे. ओझर पोलीस ठाण्याचे निरीक्षक दुर्गेश तिवारी यांना शुक्रवारी रात्री ११ वाजता मालेगांवहून मुंबईकडे मालवाहू वाहनातून गोवंश जनावरांचे मांस नेण्यात येत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार निरीक्षक तिवारी यांनी सहकाऱ्यांसोबत रात्री महामार्गावर एचएएल टाउनशीप गेट नंबर तीनसमोर सापळा रचला. संशयित वाहन दिसताच त्यांनी वाहन थांबविण्यास सांगितले.

चालकास गाडीत काय आहे याची विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांना संशय आल्याने त्यांनी वाहनाच्या मागील बाजूची तपासणी केली असता त्यांना उग्र वास आला. वाहनाची सखोल पाहणी केली असता एका काळ्या प्लास्टिकच्या कागदाखाली निळ्या रंगाचे नऊ प्लास्टिक पिंप मिळून आले. या पिंपांमध्ये मांस आढळून आले. याबाबत चालक सय्यद मसूद आलम याच्याकडे विचारणा केली असता त्याने मालेगांव येथील अमजदकडून सदर मांस घेऊन मुंबई येथे जात असल्याचे सांगितले. ओझर पोलिसांनी सदर वाहन चालकाला वाहनासह ताब्यात घेतले आहे. मांस आणि वाहन असा एकूण ४,६१००० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# आ. रोहिदास चव्हाण यांनी केला लोहा उपजिल्हा रुग्णालयाला टँकरने पाणीपुरवठा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) गटाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी दि.( २० ) जुलै रोजी उपजिल्हा रुग्णालय लोहा येथील रुग्णांच्या समस्यांची गंभीर दखल घेऊन तातडीने पाण्याविना रखडलेल्या शस्त्रक्रिया चालू करण्यासाठी तात्काळ दुसऱ्याच दिवशी दि.२१ जुलै रोजीच सकाळी अकरा वाजता स्वखर्चातून पाण्याचे टँकर लोहा उपजिल्हा रुग्णालयात रवाना केले.



जुलै चा अर्धा महिना संपत आला तरीही पाणीटंचाईचे संकट अजूनही उपजिल्हा रुग्णालयाला भेडसावत असून यामुळे अनेक शस्त्रक्रिया प्रलंबित असल्याने माजी आमदार रोहिदास चव्हाण यांना रूग्णांकडून तक्रारी द्वारे निदर्शनास आल्यामुळे उपजिल्हा रुग्णालयात जाऊन रूग्णालय प्रशासनाला धारेवर धरून रुग्णालयातील रूग्णांच्या सर्वच समस्या सोडवण्यासंदर्भात एक महिन्याचा अल्टीमेट दिला.तोपर्यंत स्व खर्चातून टँकरने पाणीपुरवठा करण्याचा दिलेला शब्द पाळला दुसऱ्या दिवशीच टँकरने पाणीपुरवठा सुरू केल्यामुळे शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण म्हणजे बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले असे जनसामान्यांमधील नेते असल्याची भावना अनेक जण व्यक्त करत आहेत. शासनाने लोहा येथील उपजिल्हा रुग्णालयाची इमारत कोट्यावधी रुपयाचा निधी दिला परंतु संबंधित गुत्तेदारांकडून कामात मलिदा लाटून निकृष्ट प्रतीच्या बांधकाम केले असल्यामुळे जागोजागी पाणी गळत असून खड्डे पडले आहेत.शासनाच्या कोट्यावधी रुपयांला चुना लावण्याची हि बाब गंभीर स्वरूपाची असल्याचे माजी आमदार रोहिदास चव्हाण म्हणाले. नेत्र शस्त्रक्रिया करण्यासाठी लोहा उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर उपलब्ध नसून केवळ ऑर्डर लोहा येथील असून पुन्हा प्रभारी म्हणून नांदेड जिल्ह्यात इतरत्र त्यांना रवानगी केलेली असल्याचे रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. बारी यांच्याकडून कळताच एवढी मोठी पदसंख्या असतानाही डेप्युटीटेशन इतरत्र दिल्यामुळे जवळपास सर्वच रुग्णांचे हाल होत असल्याचे निदर्शनास आल्याने माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी लोहा उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर जिल्हाभरात डेप्यूटेशनवर इतरत्र गेलेल्यांना तात्काळ परत लोहा येथे रुजू करण्यासंदर्भात सुचना व सर्व समस्यांचे महिनाभरात निराकरण करण्याचा अल्टीमेट दिला आहे. तसे झाले नाही तर शिवसेना स्टाईलने आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.

माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी लोहा उपजिल्हा रुग्णालयातील पाण्याविना रखडलेल्या शस्त्रक्रिया चालू करण्यासाठी व रुग्णांचे होत असलेले हाल थांबविण्यासाठी प्रशासनाला दिलेल्या शब्दाप्रमाणे पाण्याचे टँकर देऊन शब्द पाळला दुसऱ्या दिवशीच पाण्याचे टँकर उपजिल्हा रुग्णालयात रवाना झाल्याबद्दल रुग्ण व जनतेत समाधान व्यक्त केले जात आहे.

# सांगवी पोलिसांची कारवाई गावठी कट्ट्यासह लाखोचा मुद्देमाल जप्त



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी कडक कारवाईची मोहीम सुरू केल्याने सांगवी पोलिसांना आदेशित केले होते. त्यानंतर कारवाईचा धडाका सुरूच आहे मागील तीन दिवसापूर्वीच्या कारवाईनंतर पुन्हा चांगली कारवाई केली आहे त्यात शिरपूर रस्त्याजवळ गावठी बनावटी पिस्टल घेऊन जाणारे आरोपी व सहा लाख 43 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सपोनि जयेश खलाणे सो यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, उमर्टी ( मध्यप्रदेश राज्य ) गावातून भोईटी रस्त्याने शिरपुर कडे एक लाल रंगाचे फुल टी-शर्ट परीधान केलेला इसम हा चारचाकी वाहनात गावठी बनावटीचे पिस्टल घेऊन जात आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्यावरून जयेश खलाणे यांनी पी. एस. आय/संदिप पाटील, पी. एस. आय कृष्णा पाटील, सागर ठाकूर, संतोष पाटील, योगेश मोरे, रोहिदास पावरा व चालक पो. कॉ/१७ इसरार फारूकी असे पथक तयार करून तात्काळ बातमीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी रवाना केले, बातमी प्रमाणे भाईटी गावाजवळ जावून तेथे सापळा लावण्यात आला त्यानंतर काही वेळातच समोरून शिरपुर कडे जाणारी एक पांढऱ्या रंगाची चारचाकी स्विफ्ट डिझायर गाडी येताना दिसती सदर वाहन चालकास वाहन थांबविण्याचा इशारा दिला परंतु ते वाहन थाबले नाही. त्यानंतर पथकातील अमंलदारांनी सदर वाहनाचा पाठलाग करून पुढे काही अंतरावर जावून वाहनास अडविण्यात आले व सदर वाहनातील लाल फुल टी-शर्ट घातलेल्या वाहन चालकास पोसई/संदिप पाटील यांनी त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सईद आस मोहम्मद सय्यद वय ३१ वर्ष रा. श्रीरामपुर जि. अहमदनगर असे सांगितले तसेच त्याची अंगझडती व वाहनाची झडती घेतली असता त्यात मुद्देमाल मिळून आला.

१ ) १,३५००० /- रुपये किमतीचे ३ गावठी बनावटीचे पिस्टल ( मॅगझिन सह ) २ ) ८००० /- रुपये किमतीचे ८ जिवंत काडतुस ३ )5,00,000/- रुपये किमतीची एक स्विफ्ट डिसायर कार एकुण ६,४३,००० /- रूपये किमतीचा मुद्देमाल येणे प्रमाणे गावठी बनावटीचे पिस्टल ( मॅगझिन सह व जिवंत काडतुस मिळून आल्याने सदर आरोपीतां विरुध्द शिरपुर तालुका पोलीस ठाण्यात रोहिदास पावरा यांनी सरकार तर्फ फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पी. एस. आय / सुनिल वसावे करीत आहेत. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री संजय बारकुंड सो, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. किशोर काळे मा. उपविभागिय पोलीस अधिकारी श्री सचिन हिरे सो यांचे मार्गदर्शनाखाली शिरपुर तालुका पोलीस ठाणे चे प्रभारी अधिकारी जयेश खलाणे पी.एस.आय / संदिप पाटील, पी. एस. आय कृष्णा पाटील, सागर ठाकूर, संतोष पाटील, योगेश मोरे, रोहिदास पावरा व चालक इसरार फारूकी यांनी केलेली आहे.








# अभिनव गोयल यांनी स्वीकारला धुळे जिल्हाधिकारीपदाचा कार्यभार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळेच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्त झालेले अभिनव गोयल यांनी जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार आज स्वीकारला. जिल्हाधिकारी यांच्या दालनात जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडून गोयल यांनी आज सकाळी धुळे जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारण्याची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, भूसंपादन अधिकारी तुकाराम हुलवळे, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी औपचारिक ओळख करुन संवाद साधला .




# सीएससी केंद्रावर कारवाई करा : जिल्हाध्यक्ष जाधव

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील कधी आस्मानी तर कधी सुलतानीफ संकटात सापडणाऱ्या बळीराजाची साडेसाती संपता संपत नसल्याचे चित्र आहे. शासन, प्रशासन तर कधी खाजगी व्यापाऱ्याची लुट सहन करणाऱ्या शेतकऱ्यांची आता सेतू सुविधा केंद्र धारकांनीही लुट चालवली आहे. पैठण तालुक्यातील काही सेवा केंद्र धारक शासनाचा आदेशाला केराची टोपली दाखवत प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या लाभ घेणऱ्या शेतकऱ्यांकडून एक रुपयाऐवजी चक्क मनमानी पध्दतीने अव्वाच्या सव्वा आतिरीक्त पैसे उकळत असल्याची ओरड होत आहे. शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवून अशा सेवा केंद्रावर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. प्रधानमंत्री पीक विमा राज्य शासनामार्फत भरण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरून पीकविमा योजनेचा लाभ देण्यात येत आहे. शासनाच्या पीएमएफबीवाय या पोर्टलसह बँक व विमाप्रतिनिधी तसेच सामुहिक सेवा केंद्राकडे नोंदणी करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. योजना खरीप २०२३ ते रब्बी २०२५-२६ हंगामाकरिता ३ वर्षासाठी अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सन २०२३-२४ पासून राज्य शासन सर्वसमावेशक पीक विमा योजना राबवित असल्याने शेतकरी हिस्स्याची विमा हप्ता रक्कम मात्र बहुसंख्य शेतकरी या पासून अनभिज्ञ असल्याने नोंदणीसाठी त्यांचा ओढा शासनाच्या पीएमएफबीवायफ पोर्टल, बँक व विमाप्रतिनिधी ऐवजी लगतच्या सामुहिक सेवा केंद्राकडे ( सीएससी ) मोठ्या प्रमाणात आहे. सेतू सुविधा केंद्रांना नोंदणीसाठी विमा कंपनीमार्फत प्रति अर्ज ४० रुपये देण्यात येत आहे. असे असतांनाही तालुक्यात काही सेतू सुविधा केंद्र चालक शेतकऱ्यांच्या अनभिज्ञतेचा फायदा उचलत आहेत. या ठिकाणी पीकविम्याची नोंदणी करण्यासाठी जाणाऱ्या शेतकयांची मोठ्या प्रमाणात लुट होत असुन नोंदणीपोटी त्यांच्याकडून एक रुपयाऐवजी जास्तीचे पैसे उकळण्यात येत असल्याची औरड शेतकऱ्यांमधून होत आहे.

सुरु असलेल्या प्रकाराची चौकशी करण्यात येवून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव महाराष्ट्र राज्य शरद जोशी संघटना यांच्याकडून यांनी केली आहे.

जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड संचलित
: संस्थेच्या शाखा :
कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय, सहकारी साखर कारखाना, कन्नड, जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपरखेडा, ता. कन्नड, कै. काशीनाथराव पाटील जाधव प्राथमिक विद्यालय, दत्तनगर, कॉलेज रोड, कन्नड, छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय बनशेंद्रा, ता. कन्नड, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यापक विद्यालय, साखर कारखाना, कन्नड, रवींद्रनाथ टागोर प्राथमिक विद्यालय, कनकावतीनगर, कन्नड, कृष्ण- तारा प्रायमरी इंग्लिश स्कूल, दत्तनगर, कॉलेजरोड, कन्नड.
दैनिक आधुनिक केसरी वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
श्रीमती ताराबाई कृष्णराव जाधव
अध्यक्षा, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड
श्री. सागर कृष्णराव जाधव
सचिव, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड
दर्जेदार शिक्षण हीच आमची ओळख
: सौजन्य :
धर्मवीर संभाजी कर्मचारी सहकारी पतसंस्था, मर्या., कन्नड



## ममुराबाद-जेठे वस्ती रस्त्याची दुरवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ममुराबाद येथील जेठे वस्तीकडे जाणाऱ्या दोन किलोमीटर रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. यामुळे पायी चालताना जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. तसेच शाळेत जाताना विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. याकडे लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. साधारण २५ वर्षांपूर्वी तयार केलेल्या रस्त्याकडे परत कोणीही लक्ष दिले नाही. सध्या रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या चिखल साचत प्रमाणात असल्यामुळे ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी दररोज ये-जा करताना त्रास सहन दुचाकी घसरत असून, अपघात होत असल्याचे दिसून येत आहे. करावा लागतो. चिखलामुळे आहेत. स्थानिक प्रतिनिधींसह लोकप्रतिनिधीही लक्ष देत नाहीत. याकडे संबंधित विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे.

आधुनिक केसरीचा प्रथम वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
आधुनिक केसरी
महाराष्ट्र पोलीस
शुभेच्छुक
धुळे तालुका पोलीस स्टेशन, धुळे

आधुनिक केसरी च्या द्वितीय वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
आधुनिक केसरी
महाराष्ट्र पोलीस
शुभेच्छुक
देवपूर पोलीस स्टेशन, धुळे

|| नमो ||
शुभ कार्य तुमचे व्यवस्था आमची
विनोद मंडप डेकोरेटर्स अँड केटरर्स
लग्न, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, वास्तूशांती, शुभ कार्याच्या ऑर्डर स्वीकारल्या जातील.
प्रो.प्रा. विनोद जोगदंडे
9158500727, 8446185722
टाऊन हॉल, व्हीआयपी रोड, छत्रपती संभाजीगर



# आगरनांदुर गावातील रस्ते चिखलमय; ग्रा.पं.चे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील आगरनांदुर गावातील अंतर्गत रस्ते ग्रामपंचायतच्या दुर्लक्षामुळे चिखलाच्या दलदलीत अडकले असून सर्वत्र घाणीचे साम्राज्य वाढत असून रोगराईला एक प्रकारे आमंत्रण दिले जात आहे.

आगरनांदुर गावातील अंतर्गत रस्त्याचा विकास सांडपाणी जाण्यासाठी नालीचे कामे होत नाही गावातील सर्वच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पावसाची पाणी सांडपाणी साचत असल्याने संपूर्ण गावातील रस्ते चिखलमय झाली आहे त्यामुळे रस्त्यावरून चालणे त्याची कठीण झाले आहे एक साधारण जरी पाऊस पडला तरीसुद्धा रस्त्यावर फुटफुट पाणी साचत आहे .

या समस्येकडे ग्रामपंचायत लक्ष देत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहे. या समस्येकडे लक्ष द्यावे तसेच गावातील रस्त्यांच्या विकास कामासाठी प्रशासन यांनी निधी उपलब्ध करून गाव विकास करण्याची मागणी ग्रामस्थांतून होत आहे .

# पर्यावरण रक्षणासाठी बालविद्यार्थी सरसावले

## उपक्रमातून ज्ञानार्जनाचा अनोखा प्रयोग

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नकोडा ( घुग्गुस ) येथील विद्यार्थ्यांनी प्लास्टिक संकलनाचा अनोखा उपक्रम सुरू केला आहे.खाली प्लास्टिकच्या बॉटल मध्ये प्लास्टिक पिशवी,चॉकलेट-बिस्कीट इ. रॅपर भरण्याचा हा उपक्रमातून ज्ञानार्जनाचा अनोखा प्रयोग आता ग्रामपंचायत परिसरात चर्चेचा ठरला आहे.या विद्यार्थ्यांचे गावकरी कौतुक करीत आहेत.

शासनाने आता नवीन शिक्षण पद्धती आणण्याचा विचार सुरू केला आहे.उपक्रम व मातृभाषेतून शिक्षण झाले तर मुलांच्या बुद्धीचा विकास झटपट होतो असे मत शिक्षणतज्ज्ञांनी अलीकडे मांडले असतांना शासन या तत्वावर कार्य करीत आहे.विद्यार्थ्यांना सर्व बाबतीत ज्ञानसंपन्न करून विकसित करण्याची जवाबदारी प्रथमतः प्राथमिक शाळेत शिक्षकांची आहे.यात पर्यावरण संरक्षण हा विषय देखील महत्वाचा आहे.त्यामुळे जिल्हापरिषद उच्च प्राथमिक शाळा नकोडा ( घुग्गुस ) येथील सहायक शिक्षिका श्रद्धा भुसारी यांनी शक्कल लढवीत विद्यार्थ्यांना प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान समजवून,प्लास्टिक संकलनासाठी प्रोत्साहित केले. रिकाम्या प्लास्टिक बॉटल मध्ये प्लास्टिकच्या पिशव्या,चॉकलेट-बिस्किटचे रॅपर भरून ते कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडीला दिले तर गाव प्लास्टिक कचरामुक्त होऊ शकते हे पोटतिडकीने समजवून सांगितले.आणि बघता बघता हे विदयार्थी प्लास्टिक बाटलीबंद करून आणून देऊ लागले.उपक्रमातून प्लास्टिक संकलनाची व पर्यवरण रक्षणाची ही कल्पना आता पालकांतही रूढ होत आहे.

प्लास्टिक संकलनाच्या या उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा म्हणून प्लस्टिक बॉटल वेस्ट प्लॅस्टिकने भरून आणणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति बॉटल 5 रुपयांचे बक्षीस दिले जाते.यामुळे स्तुत्य उपक्रमातून अर्थार्जन करण्याची कला हे विद्यार्थी शिकत आहेत. उपक्रमातून अर्थार्जन होत असल्याने बच्चे कम्पनी खुश आहे.

**बालमनावर योग्य संस्कार व्हावे म्हणून उपक्रम**



बालमनावर केलेले संस्कार चिरकाळ टिकतात .त्यामुळे शिक्षकांची भूमिका अत्यन्त महत्वाची आहे .शालेय शिक्षण घेत असतांना सामाजिक जवाबदारीचे शिक्षण महत्वाचे आहे .ते योग्य झाले तरच उद्याचा जागरूक नागरिक घडू शकतो .पर्यावरणाला आज प्लास्टिक पासून सर्वाधिक नुकसान आहे . पर्यावरणाचे रक्षण ही प्रत्येकाची जवाबदारी आहे .याचे ज्ञान आमच्या विद्यार्थ्यांना असावे म्हणून हा उपक्रम राबवित आहे . कारणकी,बालमनावर झालेले संस्कार चिरकाळ टिकतात .

**श्रद्धा भुसारी, सहा .शिक्षिका जीप उच्चप्रा .शाळा,नकोडा( घुग्गुस )**




# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सह सरकार्यवाह मदनदास देवी यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सह सरकार्यवाह आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी संघटन मंत्री मदनदास देवी (वय ८१ वर्षे) यांचे सोमवार (२४ जुलै) रोजी पहाटे बंगळुरू येथे निधन झाले. गेल्या अनेक दिवसांपासून प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते घरीच होते. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार (२५ जुलै) रोजी सकाळी पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. देवी यांच्या निधनावर सरसंघचालक मा.मोहनजी भागवत आणि सरकार्यवाह मा. दत्तात्रेय होसबाळे यांनी शोकसंदेश पाठविला आहे. "मदनदासजी यांच्या जाण्याने आमचा ज्येष्ठ सहकारी गमावला आहे.गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या शारीरिक अस्वास्थ्याशी त्यांचा संघर्ष सुरू होता. आज पहाटे त्यांच्या या संघर्षाचा आपल्या सर्वांसाठी अत्यंत दुःखद अंत झाला आहे.श्री.मदनदासजी हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत संघ योजनेतून देण्यात आलेले पहिले प्रचारक होते. अनेक वर्षे त्यांनी परिषदेचे संघटनमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली.स्वर्गीय श्री. यशवंतराव केळकरजी यांच्या सहवासात त्यांनी संघटनकलेच्या गुणवत्तेला परिपूर्ण रूप दिले," असे या संदेशात म्हटले आहे.

आदरणीय मदनदासजी देवी यांचा जन्म ९ जुलै रोजी झाला. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा हे त्यांचे मूळ गाव. शालेय शिक्षणानंतर उच्च शिक्षणासाठी पुण्यातील बीएमसीसी महाविद्यालयात त्यांनी १९५९ मध्ये प्रवेश घेतला. एम.कॉमनंतर आयएलएस लॉ कॉलेजमध्ये सुवर्णपदकासह एलएलबीची परीक्षा उत्तीर्ण केली. राष्ट्रीय स्तरावर रँक मिळवत त्यांनी सनदी लेखापाल परीक्षा उत्तीर्ण केली. पुण्यात शिक्षण घेत असतानाच वरिष्ठ बंधू खुशालदास देवी यांच्या प्रेरणेने त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध आला. मदनदास देवी यांनी बालपणापासूनच आपले आयुष्य राष्ट्रसेवा आणि संघकार्यासाठी वाहून घेतले. आयुष्यातील जवळपास ७० वर्षे त्यांनी संघाच्या प्रचारासाठी काम केले. दैनंदिन शाखेतील स्वयंसेवकापासून सह सरकार्यवाह असा त्यांचा प्रवास झाला.

ते १९६९ पासून संघ प्रचारक होते. अभाविपमध्ये त्यांनी १९७५ पासून कामास सुरूवात केली. तेथे ते विभाग,प्रदेश व क्षेत्रीय अशा जबाबदाऱ्यांनंतर त्यांनी अ.भा. संघटन मंत्री म्हणूनही काम केले. महाविद्यालय- शहर पातळीवर संस्कारित कार्यकर्ता समूह उभा राहील यासाठी विशेष लक्ष देत त्यांनी संघटनकार्याचा पाया रचला. अनेक समर्पित कार्यकर्त्यांच्या पिढ्या त्यांनी घडविल्या.

**मंगळवारी पुण्यात अंत्यसंस्कार :** मदनदासदेवी यांचे पार्थिव सोमवारी रात्रीपर्यंत पुण्यात आणण्यात येईल . मंगळवारी सकाळी ९ वाजल्यापासून ११ वाजेपर्यंत पार्थिव मोतीबागेत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे . त्यानंतर वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर ११ .३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत . सरसंघचालक मा . डॉ .मोहन भागवत आणि सरकार्यवाह मा . दत्तात्रेय होसबाळे यावेळी उपस्थित राहतील .

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शोक संदेशात म्हटले आहे, की श्री . मदनदास देवीजी यांच्या देहावसानामुळे अत्यंत दु :ख झाले आहे . त्यांनी आपले संपूर्ण जीवन राष्ट्रसेवेसाठी समर्पित केले . त्यांच्याशी माझे केवळ घनिष्ठ संबंधच नव्हते, तर त्यांच्याकडून मला खूप काही शिकायलाही मिळाले . दु :खाच्या या प्रसंगी ईश्वर सर्व कार्यकर्ते आणि त्यांच्या कुटुंबियांना बळ देवो . ओम शांति !

# अतिक्रमण धारकांनासुद्धा भरीव मदत द्या : प्रसेनजीत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** २२ जुलै २०२३ रोजी ढगफुटी सदृष्य पावसामुळे जलगांव जामोद, संग्रामपुर तालुक्यासह विदर्भात प्रचंड पुरस्थिती निर्माण झाली. नदीकाठी असलेल्या प्रत्येक गावात पाणी शिरून घरांचे नुक़सान झाले आहे. यामध्ये घरांची पड़झड़ मोठ्या प्रमाणात झाली तसेच गुरेढोरे, शेतीचे सुद्धा खुप मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. यामध्ये एनडीआरएफ च्या निकषानुसार घरांसाठी ८ अ असलेल्या आपत्तीग्रस्तांना मदत मिळेल परंतु नदीकाठी बहुतांशी अतिक्रमण धारक गरीब वर्ग राहतो त्यांना मात्र शासनाच्या निकषानुसार कोनतीच भरीव मदत मिळु शकनार नाही त्यामुळे या शासकीय निकषात बदल करुन अतिक्रमण धारक आपतग्रस्तांना सुद्धा भरीव मदतची तरदुत करण्यात यावी अशी मागणी गेल्या दोन दिवसापासून आपत्तीग्रस्त भागाचा दौर्या प्रसंगी राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे प्रदेष सरचिटनीस प्रसेनजीत पाटिल यांनी केली. तसेच नुक़सानग्रस्त शेतकर्यांना सुद्धा तात्काळ मदत मिळावी ही मागणी सुद्धा प्रसेनजीत पाटिल यांनी शासनाकड़े केली आहे.



# राजू शेट्टी यांच्या अन्नत्याग आंदोलनास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** मणिपूरसहित देशातील इतर ठिकाणी महिलांच्यावर अत्याचार करणारे मोकाट सुटलेले असताना एक जबाबदार नागरीक या नात्याने प्रायश्चित म्हणून माजी खासदार राजू शेट्टी यांनी आजपासून पासून पुढील ७२ तास अन्नत्याग आंदोलनाला इचलकरंजी येथे सुरुवात केली. मुसळधार पाऊस पडत असतानाही त्यांच्या आंदोलनाला नागरिकांनी उपस्थिती लावून पाठिंबा दिला. मणिपूर मध्ये मानवी क्रौयाची परिसीमा झाली आहे. जवानाच्या पत्नीवरही अत्याचार झाल्याची चित्रफित पुढे आल्याने संतापाची लाट उसळली आहे. हा संदर्भ देवून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी देशभरात महिलांवरील वाढत्या अत्याचाराविरोधात कोणतीच ठोस कारवाई होत नसल्याने इचलकरंजी येथील महात्मा गांधी पुतळ्याजवळ तीन दिवस अन्नत्याग करण्याचा निर्णय घेतला आहे,असे ट्विट त्यांनी केले होते. त्यानुसार आज सकाळी ११ वाजता राजू शेट्टी यांनी ७२ तास अन्नत्याग सत्याग्रहास प्रारंभ केला.पहिल्या दिवशी त्यांच्या सोबत महंमद हुसेन मुजावर, विश्वास बालिघाटे, पुरंदर पाटील, राजू निर्मळे आदी चक्री उपोषण मध्ये सहभागी झाले आहेत. यावेळी स्वाभिमानी पक्षाचे शहराध्यक्ष विकास चौगुले, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष बसगोंड बिराजदार, बाळासाहेब पाटील, विद्याधर पाटील, निवृत्ती शिरगुरे यांच्यासह शहरातील पदाधिकारी उपस्थित होते.





# गोराळा धरण फुटल्याच्या अफवेने जळगाव हादरले

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** दुपारी साडेचार वाजता जळगाव जामोद तालुक्याच्या पायथ्याशी असलेले गोराळा धरण फुटल्याची अफवा वाऱ्यासारखी पसरली आणि लोक आपल्या चील्या पिल्यासह जीव वाचवण्यासाठी सैरभैर फिरू लागले. शहरात लोकांची एकच धावपळ उडाली. दुकानदारानी तातडीने आपली दुकाने बंद केली. लोक आपापल्या गंच्चीवर गेले. नदीनाल्याच्या कठावरील व आसपासच्या भागातील लोक शहरातील उंच ठिकाणी जावू वागले. एका क्षणात शहरात सर्वत्र धावपळ सुरू झाली.जळगाव शहराला एकंदरीत जत्रेच स्वरूप प्राप्त झाले होते. शहरात हाहाकार माजला होता.लोक भयभीत झाले होते. जीवाच्या आकांताने लोक रस्त्यावर पळत होते.अतीशय भयवह स्थीती जळगाव शहराची झाली होती. पण धरण फुटल्याची अफवाच....जळगाव जामोद पोलीस स्टेशनचे ठाणेदार दिनेश झांबरे साहेब तात्काळ घटणास्थळी पोहचून त्यांनी धरणाची पाहणी केली.यावेळी बुलढाणा जिल्ह्याचे कार्यकारी अभियंता सोळंके साहेब हे सुद्धा धरणावर हजर होते. धरण फुटले नसून सांडव्याच्या खालच्या भागातील मातीचा थोडा भराव खचला असून कालपासूनच त्यामधून पाणी वाहत आहे.त्याचा कुठलाच धोका धरणाला नाही. त्यामुळे लोकांनी घाबरून जावू नये.गोराळ धरण फुटले नाही. अफवांवर विश्वास ठेवू नये अशा प्रकारचे आवाहन जळगाव जामोदचे ठाणेदार दिनेश झांबरे यांनी सुद्धा शहरवासीयांना केले आहे.

# पतीच्या मृत्यूनंतर बँक ऑफ इंडिया कडून जयश्री लोखंडे यांना मिळाले दोन लाख

आधुनिक केसरी न्यूज

**माळशिरस :** तालुक्यातील पिलीव येथील संजय पांडुरंग लोखंडे वय अंदाजे ४५ वर्ष यांचे काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले होते.संजय लोखंडे यांचे पिलीव येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये चालू सेव्हींग्जचे खाते होते. सदरच्या खात्यामधून पंतप्रधान सुरक्षा विमा योजना अंतर्गत वर्षाला २० रुपये प्रीमियम याप्रमाणे पैसे कट झाले होते. म्हणजेच संजय पांडुरंग लोखंडे यांनी पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेअंतर्गत वर्षाला २० रुपये प्रमाणे पैसे भरून बँकेचे बिझनेस करस्पाउडंट ऋषिकेश बाळूसिंग भैस यांच्याकडे अपघाती विमा उतरवला होता.त्यांचा मृत्यू झाल्याचे समजताच बँक ऑफ इंडियाचे तात्कालीन मॅनेंजर विजय नाईक यांनी संजय लोखंडे यांच्या पत्नी जयश्री लोखंडे यांना बँकेमध्ये बोलावून घेऊन सदरच्या योजनेबद्दल माहिती सांगितली व पोलीस एफ.आय.आर,पी.एम रिपोर्ट,पासबुक झेरॉक्स,आधार कार्ड झेरॉक्स व पॅन कार्ड झेरॉक्स इत्यादी कागदपत्रांची मागणी करून जयश्री लोखंडे यांना पैसे मिळवून देण्याच्या सकारात्मक बाजूने पाठपुरावा केला.आज सोमवार दिनांक २४ जुलै रोजी जयश्री लोखंडे यांच्या खात्यावर सदर विम्याची दोन लाख रुपये रक्कम जमा झाली ती रक्कम बँकेचे मॅनेंजर योगेंद्र सी.एच,जॉन सुंदर,विनोद मोरे,राजेंद्र मोठे,अमित गांधी,ऋषिकेश भैस यांच्या हस्ते जयश्री लोखंडे यांना सुपूर्द करण्यात आली.यावेळी सर्वच बँक ऑफ इंडियाच्या ग्राहकांनी पंतप्रधान सुरक्षा विमा योजने अंतर्गत वर्षाला २० रुपये प्रमाणे प्रीमियम भरून घ्यावा असे बँक मॅनेंजर युगेंधर सी.एच यांनी आवाहन केले.सदर योजनेसाठी कोणत्याही कागदपत्रांची गरज भासत नाही.फक्त आपल्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये खाते उघडा व वर्षाला २० रुपये प्रमाणे प्रीमियम भरून आपला विमा उतरवून घ्यावा असेही यावेळी सयूगेंधर सी.एच यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.















# इर्शाळवाडी दरडग्रस्त जखमींची माजी आ. मनोहरशेठ भोईर यांनी घेतली भेट

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** रायगड जिल्ह्यातील उरण विधानसभा मतदार संघात येणाऱ्या खालापूर तालुक्यातील चौक विभागात असणाऱ्या व इर्शाळगडाच्या डोंगरावर वसलेल्या इर्शाळवाडी येथे अतिवृष्टीमुळे दरड कोसळून मोठी दुर्घटना झाली आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत 29 ग्रामस्थ हे मृत्युमुखी पडले आहेत तर शेकडो ग्रामस्थ हे जखमी झाले आहेत. दिनाकं 22 जुलै 2023 रोजी इर्शाळवाडी दरडग्रस्त जखमींची या उरण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार व जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर यांनी एमजीएम पनवेल



हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट घेतली व अस्तेने विचारपूस केली तसेच सर्वतोपरी सहकार्य करण्याचे शब्द दिला आहे.
















# कनकशिळ ते म्हसोबा वस्तीपर्यंत रस्त्याची दुरुस्ती करा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कनकशिळ या गावा पासुन ते म्हसोबा वस्ती पर्यंत जाणारा रस्ता हा अंत्यत निकृष्ठ दर्जाचा झालेला आहे व संबधीत व्यक्ती दुरुस्तीच्या कामात अडथळा निर्मान करत असून त्रस्त गांवकरी व शाळकरी मुलांनी चक्क तहसील कार्यालयासमोर आज दि 24 जुलै रोजी आंदोलन करत या विषयी तहसीलदार स्वरूप कंकाळ यांना निवेदन दिले आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि मौजे कनकशिळ येथील गावापासुन ते म्हसोबा वस्ती पर्यंत जाणारा रस्ता हा अंत्यत निकृष्ठ दर्जाचा झालेला आहे . परंतु सदरील रस्ता हा म्हसोबा  सदरील रस्ता हा पुर्विचा जुना रस्ता आहे. व सदरील रस्ता हा गट क्र. 283 मधुनच नकाशावर नोंद आहे. असल्याने सदरील रस्ता होणे गरजेचे आहे. त्यांचे कारण की, सदरील म्हसोबा वस्तीवर जवळपास 400 ते 550 लोक वस्ती असल्याने तेथील लहान मुले हे रोज जिल्हा परिषद शाळेत जाणे-येणे करतात व सदरील वस्ती मध्ये असे 1 ली ते 8 वी पर्यंत जवळ पास 70 ते 80 विद्यार्थ्यांना रोज जाणे येणे करावे लागते या मुळे विद्यार्थ्यांना खुप त्रास सहन करुन त्या खराब रस्त्यांनी जाणे येणे करावे लागत असते. व सदरील वस्तीती मधील सर्व शेतकरी असल्याने बऱ्याच शेतकऱ्यांच्या घरी गाई व म्हशी असल्याने बरेच शेतकरी हे दुग्ध व्यवसाय करीतात त्यांना मोटर सायकलवर दुध हे डेरीला घेवून जाणे सुध्दा सदरील खराब रसत्यामुळे वेळेवर पोहच करता येत नाही. यामुळे त्यांच्या दुधाचे मोठ्या प्रमाणत नुकसान होते. सदरील रसत्या बाबत या अगोदर सुध्दा आम्ही निवेदन दिलेले होते व त्यांनी सदरील रस्ता हा सरळ करुन दिलेला होता परंतु आज रोजी वरील गट क्र.283 मधील काही शेतकरी गावाच्या व शेतकऱ्यांच्या विकास कामात अडथळा निर्माण करीत आहे. तरी मा. तहसीलदार यांनी संबधीत व्यक्ती विरुद्ध कायदेशिर कार्यवाही करून आम्हा शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळवून द्यावा असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.यावेळी महिला, पुरुष व शाळकरी मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते.









## बुलढाणा अर्बन बँकेचा आर्थिक व्यवहार सुरळीत

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** बुलढाणा अर्बन को ऑफ क्रेडिट सोसायटीच्या 475 वर शाखा भारताच्या महाराष्ट्र गुजरात राजस्थान मध्यप्रदेश छत्तीसगड गोवा तेलंगणा सीमाग्र अंदमान निकोबार येथे कार्यक्षेत्र असून शाखा तेथे गोदाम ६७३ वेअर हाऊस शेतकरी व्यापार करी माल ठेवण्याची सुविधा,  तसेच पुणे व बुलढाणा येथील वस्तीगृहामध्ये सभासदांनाच्या पाल्यांना वस्ती सुविधा, संस्थेचे सहकार विद्या मंदिर बुलढाणा जिल्हा शाळा सी बी एस सी पॅटर्न, तिरुपती बालाजी आंध्र प्रदेश माहूर शिर्डी भक्ती निवास सुविधा बुकिंग सुविधा सर्व शाखेमध्ये उपलब्ध, महाराष्ट्राच्या मुख्य हायवेवर बारा रुग्णवाहिका 24 तास सेवेत, बीओटी तत्त्वावर मलकापूर चिखली महामार्ग बांधकाम व बुलढाणा



अर्बन सर्व सामाजिक उपक्रमामध्ये सहभाग संस्थेच्या शाखा कळमनुरी येथील काही  मचाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याने त्यांच्या विरुद्ध बुलढाणा अर्बनने तक्रार घेऊन गुन्हा दाखल केला आहे. याबाबत उत्तम पत्रामध्ये बातम्या झळकत होत्या सदरील बातमीचा तर्क वितर्क करून लोकांमध्ये बुलढाणा अर्बन विषयी अफवा पसरली होती सदरील अफेमुळे काही शाखांमध्ये सभासदांनी गर्दी केली होती परंतु बँकेचे कामकाज योग्य पद्धतीने चालू असल्यामुळे लोकांचे समाधान झाले असून बुलढाणा अर्बनचा व्यवहार सुरळीत चालू आहे सदरील बुलढाणा अर्बन ला आशिया खंडात प्रथम क्रमांकाचे स्थान मिळालेले आहे संस्थेच्या सर्व कामात पारदर्शकता असल्यामुळे संस्थेने लोकांच्या मनात विश्वास संपादन केला आहे कोणत्याही अफवांना बळी न पडता ग्राहक सभासदांनी संकोच आर्थिक व्यवहार करावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र वीज कामगार महासंघतर्फे रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडीजी, स्वर्गीय बाळासाहेब साठयेजी व स्वर्गीय अण्णाजी आकोटकर जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र वीज कामगार महासंघ तर्फे महा रक्तदान शिबिर चे आयोजन करण्यात आले होते.

करोना काळात महाराष्ट्र वीज कामगार महासंघ यांनी मोठ्या प्रमाणावर जनसेवा केली प्रत्येक परिसरात अन्नदान मी तर महान कार्य करण्यात आले. व गेल्या दोन वर्षापासून महाराष्ट्र वीज कामगार महासंघ स्वर्गीय दत्तोपंत ठेंगडीजि, स्वर्गीय बाळासाहेब साठयेजी व स्वर्गीय अण्णाजी आकोटकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महा रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते त्याचप्रमाणे यावर्षी



मोठ्या प्रमाणावर रक्तदान करण्यात आले या ठिकाणी उपस्थित चतुर सैंदाणे, जी एस गिरासे,मीना चव्हाण, योगेश बोरसे,प्रवीण राजपूत, मनीषा चव्हाण,प्रवीण शिरसाट, शुभम पाटील, सुनील सैंदाणे, नितीन फुलपगारे,दिलीप सोनवणे, भदाणे, निकुम,पाटील,शिवदास कोळी, बी. एन. पाटील व इतर कर्मचारी उपस्थित होते.





